SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अॅण्ड मार्बल इंडस्ट्रिज

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

CCTV CAMERA
बिघडला आहे का?
फक्त एकच कॉल ISO 9001 : 2015 Certified
Mandar Mulay
Cell : 98222 94622 | 94220 87757
www.mandarmulay.com

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. १५.०७.२०२६ | अंक नं. ०९० | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉइंट | पॉइंटसवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

कॅमल सुपरफाईन शाबुदाणा
उपवासाची कारणे अनेक, शाबुदाणा मात्र एक..
1 किलो | 500 ग्रॅम | 250 ग्रॅम पॅकिंगमध्ये उपलब्ध
कॅमल इन्स्टन्ट शाबुदाणा 1KG पॅकमध्ये उपलब्ध
सर्व किराणा दुकानात उपलब्ध
स्टॉकिस्ट
अशोक बन्सीलाल पारख
कॅमल हाऊस, आडते बाजार, अहिल्यानगर
(0241) 2343896/2341196

# गुन्हेगारी विरोधात नागरिकांचा 'महाआक्रोशमोर्चा'

## सलग चौथ्या दिवशही शहर बंद; या गुंडांचा एन्काऊंटर करा तरच जनता सुखरूप राहील : मयत आकाश दुबैय्याच्या वडिलांची थेट मागणी

श्रीरामपूर - तरुण हॉटेल व्यावसायिक आकाश दुबैया यांच्या निर्घृण हत्येच्या निषेधार्थ पुकारण्यात आलेल्या श्रीरामपूर बंदला १५ जुलै रोजी सलग चौथ्या दिवशीही व्यावसायिकांसह शाळा, महाविद्यालये आणि नागरिकांनी प्रतिसाद दिला. शहराच्या इतिहासात प्रथमच गुन्हेगारीविरोधात सलग ४ दिवस स्वयंस्फूर्तीने कडकडीत बंद पाळून शहरात महाआक्रोश मोर्चा काढण्यात आला. 'हत्या प्रकरणातील गुंडांचा एन्काऊंटर करा तरच जनता सुखरूप राहील' अशी मागणी मयत आकाश दुबैय्याचे वडील शेखर दुबैय्या यांनी राज्य सरकारसह पोलीस प्रशासनाकडे केली आहे.



आकाश दुबैय्याच्या हत्येनंतर १२ जुलैपासून सर्वपक्षीय नेत्यांनी तसेच नागरिकांनी शहरातील गुन्हेगारी टोळ्यांविरुद्ध मकोका लावून त्यांचा बिमोड करावा, अवैध धंदे बंद करावेत, या मागणीसाठी बंद पुकारलेला आहे. प्रमुख बाजारपेठा, लहान-मोठी दुकाने, टपऱ्या तसेच विविध व्यावसायिक प्रतिष्ठाने पूर्णपणे बंद राहिली. या बंदमध्ये व्यापारी, उद्योजक, विविध सामाजिक संघटना, सर्वपक्षीय कार्यकर्ते आणि सर्वधर्मीय नागरिक सहभागी झाले. तसेच सरकारी, खासगी शाळा आणि महाविद्यालयेही बंद ठेवण्यात आली. नागरिकांनी तीन दिवसांच्या शांततापूर्ण बंदमधून गुन्हेगारीविरोधातील रोष व्यक्त करत शहरात कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्याची मागणी केली आहे.

दरम्यान, १५ जुलै रोजी श्री हनुमान मंदिरापासून श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यावर महामोर्चा काढण्यात आला. मोर्चात 'आकाश दुबैय्या अमर रहे' च्या घोषणा देण्यात आल्या. तसेच पोलिसांच्या कार्यपद्धतीवरही रोष व्यक्त करण्यात आला. शहरातील सर्व गुंडांच्या टोळ्यांची पोलिसांना माहिती असून त्या सर्व टोळ्यांवर तातडीने मकोका कायद्यान्वये कारवाई करण्यात यावी, अवैध धंदे बंद करावेत अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या.

गेल्या पंधरा दिवसांत चाकू हल्ले, कोयत्याने वार, गोळीबार आणि इतर हिंसक प्रकार घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

### 'बेग व जेधे टोळीतील' गुंडांना फाशी द्या

या मोर्चात मयत आकाश दुबैय्याचे वडील शेखर दुबैय्या हेही सहभागी झाले होते. यावेळी बोलताना त्यांनी प्रचंड उद्विग्नता व्यक्त केली. घटनाक्रम सांगताना ते म्हणाले, घटनेच्या दिवशी आमच्या हॉटेलमध्ये रूम नं. १०५ मध्ये वेटर ऑर्डर घ्यायला गेला तेव्हा त्याला आरोपींनी शिवीगाळ व दमदाटी केली. त्याने खाली येवून आपल्याला सांगितल्यावर 'ते मुले कोण आहेत?', अशी विचारणा केली असता 'ते सागर बेग व जेधे यांच्यासाठी काम करतात', असे वेटरने आपल्याला सांगितले. त्यावेळी आपण सागर बेग यांना फोन करून माहिती दिली व 'ती मुले वाद घालत आहेत, तुम्ही त्यांना घेवून जा' असे म्हणालो. हे सुरु असताना आरोपी खाली आले आणि माझ्या डोळ्यादेखत माझ्या मुलाच्या डोक्यात फ्लॉवर पॉट घालून त्याचा जीव घेतला. आज माझ्यावर जी वेळ आली ती इतर कोणावर येवू नये, यासाठी या गुंडांचा एन्काऊंटर करा तरच जनता सुखरूप राहील, अशी मागणी त्यांनी केली. तसेच बेग आणि जेधे टोळीतील सर्वांना फाशी द्या, अशी मागणीही त्यांनी यावेळी करत संताप व्यक्त केला.

# मोकाट कुत्रे व कचऱ्याबाबत बंदोबस्त करा अन्यथा नागरिकांसह 'आंदोलन' करणार

नगर - शहरातील मोकाट कुत्र्यांचा वाढता उपद्रव आणि अस्वच्छतेच्या समस्येने नागरिकांना त्रस्त झाले आहेत. ही कुत्री घरांमध्ये घुसतात तसेच अस्वच्छतेमुळे कुजलेल्या कचऱ्यांची दुर्गंधी सर्वत्र पसरत असून, श्वास कोंडत आहे. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीचे शहर संघटक राजेश भालेराव यांनी याबाबत महापालिका आयुक्तांकडे प्रभाग १६ मधील समस्यांबाबत लेखी तक्रार केली असून, तातडीने उपाययोजना न केल्यास आंदोलनाचा इशारा दिला आहे. त्यांनी म्हटले आहे, सुवर्णनगर परिसरात मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट वाढला असून, ही कुत्रे थेट घरांमध्ये शिरत आहेत. इतकेच नाही तर, कुत्र्यांनी चारचाकी गाड्यांच्या वायरी कुरतडल्याच्या घटनाही घडल्या आहेत. त्यामुळे नागरिकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.

परिसरातील एका खासगी जागेवर मोठ्या प्रमाणावर कचरा टाकला जात आहे. या ठिकाणी स्वच्छता केली जात नसल्याने तिथे कचऱ्याचे ढीग साचल्याने मोठ्या प्रमाणात दुर्गंधी येत आहे. या अस्वच्छतेमुळे उंदीर आणि घुशींचा उपद्रव वाढला आहे. या समस्यांचा निपटारा करावा, अन्यथा आंदोलनाचा इशारा त्यांनी दिला आहे.

१३ वे पुण्यस्मरण - १६ जुलै
हृदयस्थ



स्व.पै. सहादूजी अनाजी गुंजाळ (तात्या)
स्व.दि.१६/०७/२०१३ (आखाडा वस्ताद)
पवित्र तुमची स्मृती अखंड तुमची माया..
नित्य असू द्या आम्हावरती,
अखंड तुमची छाया..
आपल्या पावन स्मृतिस भावपूर्ण श्रद्धांजली !
* दुःखांकित *
चंद्रकांत माणिकराव खेत्रे (कांताशेठ)
(कांदा, बटाटा, भाजीपाला, आडते कमिशन एजंट मार्केटयार्ड, अ.नगर)
(गाळा नं.२, गेट नं.२, मार्केटयार्ड, गाळा नं.२३१, नेत्ती कांदा मार्केट, अ.नगर)
बाळासाहेब माणिकराव खेत्रे । अमोल चंद्रकांत खेत्रे
महेश चंद्रकांत खेत्रे । पद्माकर कोंडिराम खेत्रे
सागर अरुण खेत्रे । युवराज अरुण खेत्रे
समस्त खेत्रे परिवार, अहिल्यानगर

## सावेडी परिसरात कुत्र्यांचा उच्छाद

### नागरिक त्रस्त; मनपाला निवेदन

नगर - शहरासह उपनगरांधील विविध कॉलन्यांमध्ये मोकाट कुत्र्यांचा उच्छाद वाढला आहे. या कुत्र्यांच्या भितीपोटी लहान मुले, वृद्ध आणि महिला घराबाहेर पडण्यास धजावत नाहीत. या कुत्र्यांचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

सावेडी परिसरातील चिंतामणी कॉलनी येथील रहिवासी प्रमोदकुमार ताराचंद छाजेड यांनी महानगरपालिका आयुक्तांना निवेदन देऊन मोकाट कुत्र्यांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधले आहे. निवेदनात म्हटले आहे की, चिंतामणी कॉलनी परिसरातील रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांचे नातेवाईक जेवणाचे डबे परिसरात फेकून देतात. तसेच, परिसरातील नाल्याकाठीही कचरा टाकला जातो. यामुळे ही कुत्री कचऱ्याच्या पिशव्या विखरून घाण करतात. यामुळे अस्वच्छता व साथीचे आजार पसरते. याबाबत महापालिका प्रशासनाकडे पाठपुरावा करुनही कोणतीही उपाययोजना होत नसल्यामुळे त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. शहराचे प्रमुख अधिकारी या नात्याने आयुक्तांनी या प्रकरणाची दखल घ्यावी आणि मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी संबंधित विभाग प्रमुखांना तात्काळ आदेश द्यावेत.

|| हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे || हरे राम हरे राम राम राम हरे हरे ||
ISKCON अहिल्यानगर
आंतरराष्ट्रीय कृष्ण भावनामृत संघ (इस्कॉन)
संस्थापकाचार्य - कृष्णकृपामूर्ति श्री श्रीमद ए.सी.भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद
श्री जगन्नाथ स्वामी नयन पथगामी भवतु मे..
श्री जगन्नाथ रथयात्रा
सप्तम वर्ष
जो भक्त भगवान श्री जगन्नाथांच्या दिव्य स्वरूपाचे दर्शन घेतो, तो केवळ उत्सव, यज्ञ आणि दान यांचेच पुण्य प्राप्त करत नाही, तर जन्म-मृत्यूच्या बंधनातून मुक्तीच्या मार्गावरही अग्रसर होतो.
रविवार, 19 जुलै 2026
रथयात्रा प्रारंभ: दुपारी 2 वा.
महाप्रसाद: संध्याकाळी 7 पासून...
रथयात्रा मार्ग: श्री मार्कण्डेय संकूल, नेप्ती नाका, दातरंगे मळा (प्रारंभ) › दिल्ली गेट › चौपाटी कारंजा › चितळे रोड › नेता सुभाष चौक › नवी पेठ रोड › अर्बन बँक रोड › जुना बाजार रोड › कापड बाजार रोड › तेलीखुंट रोड › सीताराम सारडा स्कूल रोड › सिद्धी बाग चौक › दिल्ली गेट › श्री मार्कण्डेय संकूल, नेप्ती नाका, दातरंगे मळा (समापन).
सायं. 7:00 वा. – दीपदान व महाआरती | सर्वांसाठी महाप्रसाद | कथा व सांस्कृतिक कार्यक्रम
सुशोभित रथ व आकर्षक पुष्पसजावट | हरिनाम संकीर्तन | सर्वांसाठी महाप्रसाद | दीपदान व भक्तिमय वातावरण | सांस्कृतिक कार्यक्रम व कथा
संपूर्ण परिवारासह या, रथ ओढण्याच्या दिव्य सेवेत सहभागी व्हा आणि प्रभूंच्या असीम कृपेचे भागीदार बना!

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# भिंगारमध्ये किराणा दुकानातून रोकड केली लंपास; गुन्हा दाखल

नगर - भिंगार शहरातील यशवंतनगर डेअरी फार्म परिसरामध्ये एका जनरल आणि किराणा दुकानातून चोरट्याने १२ हजार ८३० रुपये रोख रक्कम चोरून नेल्याची घटना १३ जुलै रोजी सायंकाळी ७ च्या सुमारास घडली आहे. या प्रकरणी संशयित आरोपी इरफान पप्पू पटेल (रा. यशवंतनगर डेअरी फार्म, भिंगार) याच्याविरुद्ध भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

याबाबत मिनल दिवाकर घाटविसावे (रा. केकती, शहापूर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचे यशवंतनगर डेअरी फार्म येथील सागर हाईट्स इमारतीमध्ये जनरल आणि किराणा मालाचे दुकान आहे. १३ जुलै रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास आरोपी इरफान पप्पू पटेल याने फिर्यादी यांच्या दुकानातील एकूण १२ हजार ८३० रुपये रोख रक्कम त्याने चोरून नेली. या चोरीच्या रकमेमध्ये विविध दरांच्या चलनी नोटांचा समावेश होता.या प्रकरणी फिर्यादी मिनल घाटविसावे यांनी दिलेल्या तक्रारीवरून भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात आरोपी इरफान पप्पू पटेल याच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) अन्वये चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात आणि पोलीस उपनिरीक्षक बी. बी. अकोलकर यांनी घटनास्थळी भेट देत पाहणी केली. तपास पोलीस उपनिरीक्षक अकोलकर करत आहेत.

# महापालिकेच्या ऑनलाईन प्रणालीत तांत्रिक अडचणी

## तातडीने दूर करा; विविध मागण्यांसाठी ठेकेदार संघटनेची आयुक्तांशी चर्चा; चार दिवसांत तोडगा काढण्याचे आश्वासन

नगर - अहिल्यानगर महानगरपालिकेत ऑनलाईन ई-एमबी (E-MB) प्रणालीमुळे ठेकेदारांना विविध तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत असून, कामकाजात मोठा विलंब होत आहे. या समस्यांसह अतिरिक्त जीएसटी, अनामत रक्कम आणि इतर प्रलंबित प्रश्नांबाबत अहिल्यानगर ठेकेदार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. यावेळी मांडण्यात आलेल्या मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेत येत्या ४ दिवसांत तातडीने तोडगा काढण्यात येईल, असे आश्वासन आयुक्त डांगे यांनी दिले.



महापालिकेत ऑनलाईन ई-एमबी प्रणालीमुळे येणाऱ्या समस्यांसह अतिरिक्त जीएसटी, अनामत रक्कम आणि इतर प्रलंबित प्रश्नांबाबत अहिल्यानगर ठेकेदार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. (छायाचित्र - लहू दळवी)

या बैठकीस आयुक्त यशवंत डांगे, शहर अभियंता मनोज पारखे, ठेकेदार संघटनेचे अध्यक्ष सचिन लोटके, शोएब शेख, अनुज सोनीमंडलेचा, ओमकार देशमुख, अभिजित काळे, आनंद पुंड, राहुल पडोळे, दीपक कावळे, राहुल बोरूडे, नितीन फुलसौंदर, प्रसाद साळी यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

ठेकेदार संघटनेने आयुक्तांना दिलेल्या निवेदनात नमूद केले की, अहिल्यानगर महानगरपालिकेच्या माध्यमातून शहरात रस्ते, इमारती, उद्याने, कंपाउंड, सभामंडप आदी विविध विकासकामे नोंदणीकृत ठेकेदारांमार्फत केली जातात. यापूर्वी सर्व कामांची मेजरमेंट बुक (एमबी) प्रक्रिया ऑफलाईन पद्धतीने होत होती. त्यामुळे कामकाज जलद गतीने पूर्ण होत होते. मात्र, गेल्या काही दिवसांपासून सुरू करण्यात आलेल्या ऑनलाईन ई-एमबी प्रणालीमुळे अनेक तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. अवघ्या दहा मिनिटांत पूर्ण होणाऱ्या प्रक्रियेस आता तब्बल दीड महिना लागत असल्याने ठेकेदारांचे आर्थिक व प्रशासकीय नुकसान होत आहे. याशिवाय ई-प्रणालीद्वारे प्रक्रिया करण्यासाठी ठेकेदारांकडून स्वतंत्र शुल्क आकारले जात असून, ही शुल्क आकारणी तत्काळ बंद करावी, अशी मागणी करण्यात आली.

जिल्हास्तरीय विकासकामांमध्ये ठेकेदारांना अतिरिक्त जीएसटीचा आर्थिक भार सहन करावा लागत असून, तो कमी करण्यात यावा, अशी मागणीही बैठकीत करण्यात आली. तसेच प्रत्येक विकासकामासाठी करारानुसार तीन वर्षांनंतर अनामत रक्कम (सिक्युरिटी डिपॉझिट) परत मिळणे अपेक्षित असताना अनेक ठेकेदारांना अद्याप ती रक्कम मिळालेली नाही. त्यामुळे अनामत रक्कम परत मिळण्याची प्रक्रिया अधिक सुलभ व वेळेत पूर्ण करण्यात यावी, अशी मागणी संघटनेने केली.

ठेकेदार संघटनेच्या मागण्यांची दखल घेत आयुक्त यशवंत डांगे यांनी ई-एमबी प्रणालीतील तांत्रिक त्रुटी तातडीने दूर करण्याचे निर्देश देत येत्या ४ दिवसांत आवश्यक सुधारणा करण्यात येतील, असे स्पष्ट केले.तसेच विकासकामांच्या बिलांवर ठेकेदारांना अतिरिक्त जीएसटीचा भार पडणार नाही, यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येईल. याशिवाय अनामत रक्कम परत मिळण्याबाबतही महत्त्वाचा निर्णय घेत अनामत रक्कम काढण्याचा कालावधी पाच वर्षांपर्यंत उपलब्ध करून देण्याची तरतूद करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

बैठकीत झालेल्या चर्चेमुळे ठेकेदारांच्या प्रलंबित प्रश्नांवर लवकरच मार्ग निघेल, अशी अपेक्षा ठेकेदार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

# अपहरण करून तरूणाला दांडक्याने बेदम मारहाण

## सोशल मिडीयावरील व्हायरल व्हिडीओनंतर पोलिसांकडून चौघांवर गुन्हा दाखल

नगर - बोल्हेगाव येथे तरूणाला रिक्षातून फूस लावून बोलावून घेतल्यानंतर जबरदस्तीने दुचाकीवर बसवून शेतात नेऊन लाकडी दांडका, कमरेचा बेल्ट तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना उघडकीस आली आहे. विशेष म्हणजे, जखमी तरूणाने फिर्याद दाखल न केल्याने तोफखाना पोलिसांनी सोशल मिडीयावर व्हायरल झालेल्या व्हिडीओ बाबत चौकशी केल्यावर सरकारी फिर्यादीवरून चौघांसह इतरांविरूध्द गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत पोलीस अंमलदार अब्दुलकादर इनामदार यांनी सरकारतर्फे फिर्याद दिली आहे. त्यानुसार अमीर शेख, अमानत अन्सारी, यश शिरसाठ, चेतन सरोदे (सर्व रा. बोल्हेगाव) तसेच त्यांच्या इतर साथीदारांविरूध्द १४ जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १३ जुलै रोजी अंमलदार इनामदार यांना त्यांच्या मोबाईलवरील व्हॉट्सअ‍ॅपवर एका मारहाणीचा व्हिडिओ प्राप्त झाला. या व्हिडिओमध्ये गोविंदपुरा येथील फैजान समीर सय्यद यांना काहीजण लाकडी दांडका, कमरेचा बेल्ट तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण करत असल्याचे दिसून आले. त्यानंतर पोलिसांनी फैजान यांची भेट घेऊन चौकशी केली. फैजानने दिलेल्या माहितीनुसार, २४ जून रोजी सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास ते रिक्षातून भाडे घेऊन बोल्हेगाव चौकात गेले होते.

त्यावेळी ओळखीचे अमीर शेख व अमानत अन्सारी यांनी त्यांना बोलावून घेतले. त्यानंतर जबरदस्तीने त्यांच्या दुचाकीवर बसवून बोल्हेगाव येथील सय्यद यांच्या शेतात नेले. तेथे यश शिरसाठ, चेतन सरोदे व इतर साथीदार आधीच जमले होते. यावेळी अमानत अन्सारी याने, तुझा भाऊ माझ्या बहिणीला विनाकारण मारहाण करून शिवीगाळ करतो, असा आरोप करत लाकडी दांडके, कमरेच्या बेल्टने तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या घटनेबाबत जखमी फैजानने स्वतः फिर्याद देण्यासाठी पोलीस ठाण्यात न आल्याने तोफखाना पोलिसांनी सरकारी फिर्यादीवरून गुन्हा दाखल केला आहे.

# ‘दाखल केस’ मागे घेण्यासाठी महिलेला जिवे मारण्याची धमकी; गुन्हा दाखल

नगर - शहरातील धरती चौक परिसरातील महाराणी गल्लीत भावाने दाखल केलेली केस मागे घेण्यासाठी एका महिलेचा विनयभंग करून तिला व तिच्या भावाला जिवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस तपास करत आहेत.

ही घटना १४ जुलै रोजी सायंकाळी साडेसात वाजेच्या सुमारास घडली. पीडित महिला आपल्या घरी असताना आरोपी विकार शाबीर सय्यद (रा. महाराणी गल्ली, धरती चौक) याने तिच्या घरात प्रवेश केला. त्याने पीडितेच्या भावाने पोलीस ठाण्यात दिलेली केस मागे घेण्याचा तगादा लावला. महिलेने या गोष्टीला नकार दिला असता आरोपीने संतापून तिला अश्लील भाषेत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यानंतर आरोपीने महिलेचा हात धरून तिची लज्ञा उत्पन्न होईल असे वर्तन केले. एवढ्यावरच न थांबता, जर केस मागे घेतली नाही तर तुला आणि तुझ्या भावाला जिवे मारून टाकू, अशी धमकी आरोपीने दिली असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी विकार शाबीर सय्यद याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# झाड तोडण्यास विरोध केल्याने मारहाण

नगर - शेतातील बांधावरील बोरीचे झाड तोडण्यास विरोध केला म्हणून एका ६० वर्षीय वृद्धेला लाथा-बुक्क्यांनी आणि प्लास्टिकच्या पाईपने बेदम मारहाण केल्याची नगर तालुक्यातील वारुळवाडी येथे १३ जुलै रोजी दुपारी ४ च्या सुमारास घडली. या मारहाणीत वृद्धेच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून तिच्या गळ्यातील सोन्याचे दागिनेही गहाळ झाले आहेत.

याबाबत भीमाबाई सुभाष वारुळे (वय ६०, रा.वारुळवाडी, ता. नगर) यांनी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी व आरोपी यांच्या सामाईक शेतात बांधावर असलेले बोरीचे झाड तोडण्याचे काम सुरू होते. या झाड तोडण्याला वृद्धेने विरोध केला. याचाच राग मनात धरून चार आरोपींनी वृद्धेला घेराव घातला. शिवीगाळ करत लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली आणि जीवे मारण्याची धमकी दिली. तर एका महिला आरोपीने वृद्धेच्या डोक्यात प्लास्टिकचा पाईप मारून तिला रक्तबंबाळ केले. या झटापटीत वृद्धेच्या गळ्यातील पाच ग्रॅमचे सोन्याचे डोरले शेतात कुठे तरी पडून गहाळ झाले आहे.

या घटनेनंतर जखमी वृद्धेला तातडीने उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात प्रकाश बबन वारुळे, बबन भगवंता वारुळे, हिराबाई बबन वारुळे, कावेरी प्रकाश वारुळे (सर्व रा. वारुळवाडी, ता.नगर) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## भैरवनाथ सेवा सोसायटीचे चेअरमन प्रेमराज भोयेटे यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर - सांगवी येथील भैरवनाथ सेवा सोसायटीचे चेअरमन



प्रेमराज दगडू भोयटे (प्रेमा काका, ८६) यांचे १५ जुलै रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांचा अंत्यविधी घोड भिमानदी संगमावर करण्यात आला.

प्रेमराज हे सांगवी गावचे माजी सरपंच, जिल्हा बँकेचे माजी संचालक तसेच नागवडे सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक होते.

त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, सून, नातवंडे असा परिवार आहे. धनसिंग विठ्ठलराव भोयटे यांचे ते चुलते होत.

## श्रीमती शकुंतलाबाई पर्वते यांचे निधन

नगर - नालेगाव, कुंभार गल्ली येथील रहिवाशी श्रीमती



शकुंतलाबाई बबनराव पर्वते (वय ७७) यांचे १४ जुलै रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर १५ जुलै रोजी नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

उद्योजक राम पर्वते यांच्या त्या भावजयी होत.

## श्रीमती कमलबाई दिघे यांचे निधन

नगर - रेणुका बंगला, रेल्वे ओव्हर ब्रिज जवळ, पुणे रोड



येथील रहिवाशी श्रीमती कमलबाई विश्वनाथ दिघे (वय ८५) यांचे १४ जुलै रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर १५ जुलै रोजी नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. अ‍ॅड. अनिता दिघे यांच्या त्या मातोश्री होत.

## श्रीमती दयाबाई आहुजा यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीरामपूर - येथील श्रीमती दयाबाई नानकराम आहुजा (वय ९५) यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले.

नारायण क्रॉकरीचे मालक हरिलाल व नारायण (बबलू) आहुजा यांच्या मातोश्री, जगदिश, सुमित व राहूल आहुजा यांच्या त्या आजी होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# तरुणाचा जीव गेल्यावर आणि जनता रस्त्यावर उतरल्याने ‘जिल्ह्यातील पोलिसांना आली जाग’

## श्रीरामपुरातील अवैध धंदे आणि गुन्हेगारी मोडून काढण्यासाठी अखेर पोलीस प्रशासन सरसावले

नगर - गेल्या १५ दिवसांत ४ प्राणघातक हल्ले आणि ११ जुलैला तरुण हॉटेल व्यावसायिक आकाश दुबैय्या याची हत्या झाल्यानंतर श्रीरामपूर शहरातील नागरिकांच्या संयमाचा बांध फुटला. सलग ४ दिवस शहर बंद ठेवत नागरिक रस्त्यावर उतरले. पोलिसांची संपूर्ण राज्यभरात प्रचंड नाचक्की झाल्यावर आणि जनतेच्या झालेल्या उद्रेकानंतर अखेर पोलीस प्रशासनाला खडबडून जाग आली आहे. त्यामुळे त्यांनी गेल्या २ दिवसांपासून श्रीरामपुरातील अवैध धंदे आणि गुन्हेगारी मोडून काढण्यासाठी पाऊले उचलण्यास सुरुवात केली आहे.

श्रीरामपूर शहरात अलीकडील काळात गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. हॉटेल व्यावसायिक आकाश दुबैय्या यांच्या खुनानंतर शहरात तीव्र संतापाची लाट उसळली असून १५ जुलै रोजी सलग चौथ्या दिवशीही बंद पाळण्यात आला. या घटनेनंतर गुन्हेगारांविरोधात कठोर कारवाईची मागणी अधिक तीव्र झाली आहे. याच पार्श्वभूमीवर काही स्थानिक लोकप्रतिनिधींनी पोलिसांवर गंभीर आरोप केले होते. दरोडे, खून, वाळू तस्करीसारख्या गंभीर गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या सराईत गुन्हेगारांशी काही पोलीस कर्मचाऱ्यांचे संबंध असून त्यांच्या अवैध धंद्यांना संरक्षण दिले जात असल्याचा आरोप करण्यात आला होता.

श्रीरामपूर शहरातील वाढत्या गुन्हेगारीमुळे पोलिसांच्या कार्यक्षमतेवर सातत्याने प्रश्न उपस्थित होत असताना गुन्हेगारांशी कथित संबंध असल्याच्या आरोपांमुळे पोलीस दलाची प्रतिमा मलीन होत असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त केली जात होती. या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी पोलीस यंत्रणेला कामाला लावले आहे.



श्रीरामपूर येथे गांजाचा साठा पकडल्यानंतर आरोपीसमवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

### श्रीरामपुरात अंमली पदार्थ विरोधी मोठी कारवाई

पोलीस अधीक्षकांनी कान टोचल्यानंतर श्रीरामपूर शहर पोलिसांनी कुख्यात गुंड सोनू बेग याच्या फ्लॅटवर १३ जुलै रोजी रात्री छापा टाकून पिस्तुल, काडतुसे आणि काही संशयास्पद वस्तू जप्त करत सोनू बेगसह त्याची पत्नी आणि मेव्हयावर गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर स्थानिक गुन्हे शाखा आणि श्रीरामपूर शहर पोलिसांनी १४ जुलै रोजी दुपारी अंमली पदार्थ विरोधी कायद्यांतर्गत संयुक्त कारवाई करत एका संशयिताला ताब्यात घेतले आहे, तर त्याचा एक साथीदार फरार झाला आहे. कुरेशी मोहल्ला येथील उर्दू शाळा क्रमांक ५ जवळ पोलिसांनी ही कारवाई केली. तेथे आरोपी इरफान छोटू शेख (वय ४०) हा अंमली पदार्थ ’गांजा’ विक्री करण्याच्या उद्देशाने स्वतःच्या कब्जात बाळगताना मिळून आला. पोलिसांनी त्याच्याकडून १७ हजार ६२१ रुपये किमतीचा सुमारे ६०४.८४ ग्रॅम वजनाचा गांजा आणि एक इलेक्ट्रॉनिक वजनकाटा जप्त केला आहे. या प्रकरणी फकीर (पूर्ण नाव माहीत नाही, रा. बजरंग चौक) नावाचा दुसरा आरोपी फरार असून, श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### तडीपार असलेल्या गुंडाला ठोकल्या बेड्या

प्रशासनाच्या आणि पोलीस अधीक्षकांच्या आदेशाला केराची टोपली दाखवून शहरात बेकायदेशीरपणे वावरणाऱ्या एका तडीपार गुंडाला श्रीरामपूर शहर पोलिसांनी १४ जुलै रोजी दुपारी बेड्या ठोकल्या आहेत. आरबाज मस्तान शेख (वय २५, रा. नवीन तहसील, वॉर्ड नं. १, श्रीरामपूर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. सक्षम न्यायालयाची किंवा पोलीस प्रशासनाची कोणतीही लेखी परवानगी नसताना तो श्रीरामपूर ते नेवासा रोडवरील ओव्हर ब्रिजजवळ, इंदिरा नगरकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कडेला वावरत असताना पोलिसांच्या जाळ्यात सापडला. आरोपीने तडीपारीच्या आदेशाचे उल्लंघन केल्यामुळे त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम १४२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### रात्रीच्या वेळी संशयास्पद फिरणारे दोघे पकडले

शहरात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी श्रीरामपूर शहर पोलिसांतर्फे राबविण्यात येत असलेल्या ’ऑल आउट ऑपरेशन’ दरम्यान रात्रीच्या वेळी संशयास्पदरित्या फिरणाऱ्या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. आदर्श लॉजसमोरील एका पडक्या खोलीच्या आडोशाला आरबाज जाकीर शेख (वय २५, रा. राममंदिर रोड) आणि समीर मोहम्मद सय्यद (वय २१, रा. लोणार गल्ली) हे दोघे १३ जुलै रोजी रात्री गुन्हेगारी कृत्य करण्याच्या उद्देशाने दबा धरून बसले होते. पेट्रोलिंग दरम्यान पोलिसांना संशय आल्याने त्यांनी ही कारवाई केली. या दोघांविरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १२२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### सराईत गुन्हेगाराशी संबंध; पोलीस कर्मचारी निलंबित

श्रीरामपूर येथील एका सराईत गुन्हेगाराशी संबंध असल्याचा आरोप असलेल्या पोलीस अंमलदार शंकर चौधरी याला पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी निलंबित केले आहे. श्रीरामपूरमध्ये वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई झाल्याने जिल्हा पोलीस दलात खळबळ उडाली आहे. शंकर चौधरी हा सध्या पोलीस मुख्यालयात कार्यरत होता. यापूर्वी त्याची नेमणूक श्रीरामपूर येथील अप्पर पोलीस अधीक्षक कार्यालयात होती. मात्र, गुटखा तस्करीशी संबंधित कथित हप्तेखोरीच्या आरोपांनंतर तत्कालीन पोलीस अधीक्षकांनी त्याची बदली पोलीस मुख्यालयात केली होती. त्यानंतरही त्याच्या विरोधातील तक्रारी कायम राहिल्याने अखेर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

### गुन्हा घडूच नये यासाठी उपाययोजना आवश्यक

दरम्यान, श्रीरामपूर मध्ये गुन्हेगारांवर वेळेवर आणि प्रभावी कारवाई होत नसल्यामुळेच गुन्हेगारीला खतपाणी मिळत असल्याची टीका सातत्याने होत आहे. गुन्हा घडल्यानंतर कारवाई करण्यापेक्षा गुन्हा घडूच नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना अधिक प्रभावीपणे राबविण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे. अशा परिस्थितीत पोलीस कर्मचार्यांचे गुन्हेगारांशी कथित संबंध समोर आल्याने जनतेत संताप व्यक्त होत आहे.

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजनेसाठी २८ जुलैपर्यंत अर्ज करा

नगर - सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १० वी, १२ वी, पदवी, पदव्युत्तर तसेच वैद्यकीय व अभियांत्रिकी प्रवेश अभ्यासक्रमांसाठी ६० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या मातंग समाज व तत्सम १२ पोटजातींतील विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजनेसाठी २८ जुलैपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापकांनी केले आहे.

मांग, मातंग, मिनी मादीग, मादीग, दानखनी मांग, मांग महाशी, मदारी, राधे मांग, मांग गारुडी, मांग गारोडी, मादगी व मादीगा या १२ पोटजातींतील पात्र विद्यार्थी व विद्यार्थिनींनी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), जिल्हा कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगर-मनमाड मार्ग, सावेडी, अहिल्यानगर येथे प्रत्यक्ष किंवा dmlasdcnagar@gmail.com या ई-मेलद्वारे सादर करावेत.

अर्जासोबत जात प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, गुणपत्रिका, पुढील वर्गात प्रवेश घेतल्याचा पुरावा, प्रवेश नोंदणी पावती अथवा बोनाफाईड प्रमाणपत्र, आधार कार्ड किंवा मतदान ओळखपत्र अथवा रेशनकार्ड तसेच अलीकडील पासपोर्ट आकाराचे एक छायाचित्र जोडणे आवश्यक आहे.

माहितीसाठी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्या जिल्हा कार्यालयाशी संपर्क साधावा.

# गृहिणी

## आरोग्य

### योग : निरोगी आयुष्याची सुरुवात

आजच्या धावपळीच्या जीवनात शरीर आणि मन दोन्ही ठिकाणाला ठेवणे कठीण झाले आहे. अशा वेळी योग हा त्यावरचा सर्वात सोपा आणि नैसर्गिक उपाय आहे. योग म्हणजे फक्त व्यायाम नाही तर शरीर, मन आणि आत्म्याला जोडणारी एक कला आहे.रोज सकाळी २० ते ३० मिनिटे योग केल्याने शरीरात आश्चर्यकारक बदल जाणवतात. सर्वात आधी शरीर लवचिक होते. स्नायूंचा ताठरपणा कमी होतो आणि पाठदुखी, मानदुखी सारखे त्रास आपोआप कमी व्हायला लागतात. सूर्यनमस्कार आणि इतर आसनांमुळे शरीरातील रक्ताभिसरण सुधारते ज्यामुळे हृदय निरोगी राहते आणि रक्तदाब तसेच साखर नियंत्रणात राहते. पचनक्रियाही सुरळीत होते. पोटाचे विकार, गॅस, अपचन कमी होते आणि शरीरातील अतिरिक्त वजन देखील कमी होण्यास मदत होते.शरीरासोबतच मनावरही योगाचा खूप मोठा परिणाम होतो. प्राणायाम आणि ध्यानामुळे मन शांत होते. कामाचा ताण, चिंता आणि चिडचिड कमी होते. रात्री शांत झोप लागते आणि दुसऱ्या दिवशी कामात एकाग्रता वाढते. विद्यार्थ्यांसाठी आणि नोकरी करणाऱ्यांसाठी हे खूप उपयोगी आहे. ध्यानामुळे विचार सकारात्मक होतात आणि आत्मविश्वास वाढतो. वयाची कोणतीही अट नाही. मुले, तरुण तसेच वयस्कर मंडळी सर्वांसाठी योग फायदेशीर आहे. लहान मुलांची स्मरणशक्ती वाढते, तरुणांचा तणाव कमी होतो आणि वयस्कर लोकांचे सांधे मजबूत होतात. थोडक्यात सांगायचे तर योग ही फक्त अर्धा तासाची क्रिया नाही. ती आयुष्य जगण्याची एक पद्धत आहे. जी आपल्याला आतून आणि बाहेरून निरोगी ठेवते. त्यासाठी महागडे जिम किंवा उपकरणांची गरज नाही. फक्त एक सतरंजी आणि स्वतःसाठी थोडा वेळ एवढेच पुरेसे आहे.

## पाककला

### मावा जिलेबी

**साहित्य :** मावा २५० ग्रॅम, मैदा २ चमचे, बेकिंग सोडा १ चिमूट, दूध २-३ चमचे, तूप तळण्यासाठी पाकासाठी: साखर २ वाटी, पाणी १ वाटी, वेलची पूड १/२ चमचा, केशर ५-६ काड्या, लिंबाचा रस १/२ चमचा

**कृती :** मावा किसून घ्या. त्यात मैदा, सोडा आणि थोडे थोडे दूध घालून मऊ पीठ मळा. १५ मिनिटे झाकून ठेवा. साखर आणि पाण्याचा एक तारी पाक करा. त्यात केशर, वेलची पूड आणि लिंबाचा रस घाला. तूप कढईत गरम करा. जिलेबीचे पीठ पाईपिंग बॅगमध्ये भरून गोल गरम तुपात सोडा. दोन्ही बाजूने सोनेरी तळा. गरम जिलेबी लगेच गरम पाकात २ मिनिटे बुडवून काढा. तयार मावा जिलेबी वेलची आणि पिस्त्याने सजवून गरम सर्व्ह करा.

## वास्तू

### मुख्य वीज मिटर

* घराचा मुख्य इलेक्ट्रिसिटी मीटर, मुख्य स्विच बोर्ड किंवा फ्युज बॉक्स नेहमी घराच्या आग्नेय कोपऱ्यात बसवावा. ही अग्नीची दिशा असल्याने विजेच्या उपकरणांसाठी सर्वात शुभ मानली जाते.

* इन्व्हर्टर आणि जनरेटर पॉवर बॅकअपसाठी वापरण्यात येणारे इन्व्हर्टर किंवा जनरेटर देखील आग्नेय किंवा वायव्य कोपऱ्यात ठेवावेत. हे उपकरण कधीही ईशान्य किंवा नैऋत्य कोपऱ्यात ठेवू नये.

* एसी किंवा कुलर हे खोलीच्या वायव्य किंवा पूर्व/उत्तर भिंतीवर बसवावेत. नैऋत्य कोपऱ्यात एसी बसवणे शक्यतो टाळावे.

## सौंदर्य

* केमिकल शॅम्पू आणि हेअर डायचा वापर मर्यादित करा. केसांच्या मजबुतीसाठी आणि नैसर्गिक काळेपणासाठी आवळा, रीठा, शिकेकाईचा वापर करावा.

* केमिकल स्क्रब्स त्वचेच्या वरच्या नाजूक थराला इजा पोहोचवू शकतात. त्याऐवजी आठवड्यातून एकदा घरात उपलब्ध असणारी बारीक साखरेची पावडर आणि मध एकत्र करून अगदी हलक्या हाताने चेहरा स्क्रब करा.

## सल्ला

कोपऱ्यात मुंग्या झाल्यास तिथे थोडे मीठ किंवा दालचिनीची पावडर टाकल्यास मुंग्या पळून जातात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. १६ जुलै २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, आषाढ शुक्लपक्ष, आश्लेषा १९।५२, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०६ वा. ०६ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** कामात गती राहील. कुटुंबाकडून सहकार्य मिळेल.

**वृषभ :** व्यवसायात नफा होईल. परदेशी संबंधातून लाभ.

**मिथुन :** महत्त्वाची माहिती समजेल. प्रवास सुखकर होईल.

**कर्क :** मौज-मस्तीची संधी मिळेल. दैनंदिन कामात विलंब.

**सिंह :** वैवाहिक जीवनात सामंजस्य राहील. मनात संभ्रम.

**कन्या :** नोकरीत स्थिरता राहील. विरोधक पराभूत होतील.

**तूळ :** कार्यक्षेत्रात संधी मिळेल. मन थोडे अस्वस्थ राहील.

**वृश्चिक :** कामात यश आणि आर्थिक लाभ. नवीन योजना सुरू होतील.

**धनु :** मनात संभ्रम राहील. घरात तणावाचे वातावरण.

**मकर :** दिवसाची सुरुवात चांगली होईल. आत्मविश्वास वाढेल.

**कुंभ :** परिस्थितीत बदल होतील. खर्चावर नियंत्रण ठेवावे लागेल.

**मीन :** सामाजिक कार्यात सहभाग वाढेल. धनलाभ आणि मान वाढेल.

# शब्दगंध क्र. ७४७४

सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | ■ | ४ | ५ | |
| | ■ | ६ | | ७ | | | ■ |
| ८ | ९ | | ■ | १० | | ■ | ११ |
| १२ | | | १३ | ■ | १४ | | |
| ■ | | ■ | १५ | १६ | ■ | ■ | |
| १७ | ■ | १८ | | | | १९ | ■ |
| २० | २१ | | ■ | | ■ | २२ | २३ |
| २४ | | | | ■ | २५ | | |

**आडवे शब्द :-** १) एक शस्त्र; तलवार ४) गाईम्हशीचे पिलू; पाडस; लेकरू ६) फिरस्ता; गोसावी ८) छान; सुंदर; सुबक १०) गोडधोड करून खाण्याचा उत्साहाचा किंवा आनंदाचा दिवस १२) कांचन; कनक; सुवर्ण; सोने १४) थंड; गार १५) ज्याला बोलता येत नाही असा १८) पुरुषाचे एक आदरार्थी टोपणनाव २०) सारखा; बरोबर; पंचप्राणांपैकी एक २२) हलक्या दर्जाचे; कमी प्रतीचे २४) मुख्य धान्ये सोडून इतर गौण धान्ये २५) एक फळ

**उभे शब्द :-** १) लिंबूरस, पाणी व साखर यांच्या मिश्रणाचे पेय २) गुडघ्याच्या खालपर्यंत येणारा पुरुषाचा एक जाड अंगरखा ३) एक प्रकारची दारू ४) काशीचे दुसरे नाव; बनारस ५) सारखा; समान; बरोबर ७) साठ मिनिटांचा कालावधी; घंटा ९) चापट: मऊ पदार्थाचा आघात ११) जिल्ह्याचे ठिकाण असलेले मराठवाड्यातील एक शहर १३) गंगेची एक उपनदी १६) बांगड्या भरणारा किंवा विकणारा १७) कडक पाठ असलेला एक जलचर १८) शीख धर्माचे संस्थापक १९) भगिनी २१) चोप; ताडन २३) धमनी; रक्तवाहिनी; शीर; नाडी

### शब्दगंध क्र. ७४७३ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| चं | पा | क | ली | ■ | चं | प | क |
| द | र | ड | ■ | क | पा | ळ | ■ |
| न | ■ | क | द | ■ | र | ■ | प्र |
| ब | क | ■ | ला | व | ण्य | व | ती |
| ट | र | फ | ल | ■ | ■ | डा | क |
| वा | क | डा | ■ | बा | सा | ■ | ■ |
| ■ | री | ■ | झे | ल | म | ■ | छं |
| फ | त | क | ल | ■ | ना | र | द |

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

**सुविचार** : गर्दीचा भाग होण्यापेक्षा, गर्दी ज्याच्यासाठी जमते असा माणूस बना.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### कॅलिस्थेनिक्स आणि जिम्नॅस्टिक्स: ताकद, तंत्रातील फरत काय आहे?

कॅलिस्थेनिक्स आणि जिम्नॅस्टिक्स या दोन्ही क्रीडाप्रकारांचे मूळ मानवी शरीराच्या नैसर्गिक ताकदीवर अवलंबून असले, तरी त्यांची उद्दिष्टे, संस्कृती आणि सराव करण्याच्या पद्धतीत खूप मोठा आणि रंजक फरक आहे. हा फरक केवळ नियमांचा नाही, तर त्यामागील विचारसरणीचा आहे.

जिम्नॅस्टिक्स हा प्रामुक्षाने एक अत्यंत शिस्तबद्ध, नियमबद्ध आणि स्पर्धात्मक खेळ आहे. ऑलिम्पिक सारख्या जागतिक स्तरावर यात शरीराची लवचिकता, समतोल आणि अचूकता तपासली जाते. इथे प्रत्येक हालचालीला गुणांकन असते, जिथे तुमची पोझ किती परफेक्ट आहे आणि लँडिंग किती स्थिर आहे यावर तुमचे यश ठरते. दुसरीकडे, कॅलिस्थेनिक्स हा मूळचा शारीरिक तंदुरुस्ती आणि स्वातंत्र्याचा प्रकार आहे. 'कॅलिस्थेनिक्स' हा शब्द ग्रीक शब्द Kallos (सौंदर्य) आणि Sthenos (ताकद) यापासून बनला असून याचा मुख्य हेतू स्वतःच्या शरीराच्या वजनाचा (Bodyweight) वापर करून कमालीची ताकद आणि स्नायूंचे नियंत्रण मिळवणे हा असतो. यात कुठल्याही कडक नियमांपेक्षा स्वतःच्या क्षमतेची मर्यादा ओलांडण्याला जास्त महत्त्व असते. या दोन्ही प्रकारांत उपकरणांचा वापर आणि सरावाची जागा यातही मोठा बदल पाहायला मिळतो. जिम्नॅस्टिक्समध्ये अत्यंत विशिष्ट आणि प्रमाणित उपकरणांची गरज असते. पोमेल हॉर्स (Pommel Horse), पॅरेलल बार्स, रोमन्स रिंग्ज, अनइव्हन बार्स आणि व्हॉल्टिंग टेबल यांसारख्या साधनांशिवाय जिम्नॅस्टिक्स पूर्ण होऊ शकत नाही आणि हा सराव सहसा एका बंदिस्त, गादीने सुरक्षित केलेल्या (Matted) हॉलमध्येच होतो. याउलट, कॅलिस्थेनिक्सचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्याचे स्वातंत्र्य असून याला 'स्ट्रीट वर्कआउट' (Street Workout) असेही म्हणतात. यासाठी तुम्हाला फक्त एका साध्या पुल-अप बारची किंवा पॅरालेट्सची गरज भासू शकते, तर अनेकदा कोणत्याही उपकरणाशिवाय, केवळ जमिनीवर किंवा बागेतील एखाद्या लोखंडी पाईपचा आधार घेऊनही कॅलिस्थेनिक्सचा पूर्ण वर्कआउट करता येतो.

हालचालींचे स्वरूप आणि तंत्र पाहता, जिम्नॅस्टिक्समधील हालचाली या अतिशय वेगवान, प्रवाही आणि डायनॅमिक असतात. हवेत कोलांटउड्या मारणे (Flips), वेगाने फिरणे (Spins) आणि एका सेकंदात शरीराचा तोल बदलणे ही जिम्नॅस्टिक्सची ओळख आहे, जिथे शरीराची लवचिकता आणि गती यांचा मेळ घालणे गरजेचे असते. कॅलिस्थेनिक्समध्ये मात्र ताकद आणि स्थिरतेवर जास्त भर दिला जातो. प्रशिक्षण आणि वयाच्या अटींचा विचार केला तर जिम्नॅस्टिक्सची सुरुवात सहसा बालपणापासून (वय वर्षे ४ ते ६) करावी लागते, कारण वयानुसार शरीराची लवचिकता कमी होत जाते आणि यात प्रशिक्षकाचे मार्गदर्शन व कठोर शिस्त अनिवार्य असते. कॅलिस्थेनिक्स मात्र कोणत्याही वयात सुरू करता येऊ शकते. जर तुमच्याकडे मूळ शारीरिक ताकद असेल, तर तुम्ही वयाच्या विसाव्या किंवा तिसाव्या वर्षीही यात प्रगती करू शकता कारण यात सरावाचे नियम आणि प्रगतीचा वेग स्वतःच्या क्षमतेनुसार बदलता येतो. थोडक्यात सांगायचे तर, जिम्नॅस्टिक्स म्हणजे मानवी शरीराने हवेत रचलेले एक अचूक, नियमबद्ध आणि सुंदर काव्य आहे; तर कॅलिस्थेनिक्स म्हणजे स्वतःच्या शरीरावर संपूर्ण नियंत्रण मिळवून दाखवलेले ताकदीचे आणि स्वातंत्र्याचे प्रदर्शन आहे.

## सुटकेचा मार्ग

एका समृद्ध गावात विनायक नावाचा एक अतिशय बुद्धिमान आणि कष्टाळू तरुण राहत असे. तो आपल्या कुटुंबाचा मुख्य आधार होता आणि गावात त्याचे खूप नाव होते. पण म्हणतात ना, वाईट संगत कधी आणि कशी रंग बदलते, हे समजत नाही. एका नव्या मित्राच्या संगतीत विनायकला हळूहळू जुगार आणि मद्यपानाचे व्यसन लागले.

सुरुवातीला तो केवळ 'मजा' म्हणून या गोष्टी करायचा. त्याला वाटायचे की, जेव्हा मनात येईल तेव्हा मी हे थांबवू शकतो. पण हळूहळू ते व्यसन त्याच्या विचारांवर आणि आयुष्यावर ताबा मिळवू लागले. व्यवसायात नुकसान होऊ लागले, घरातील सुखाची जागा भांडणांनी घेतली आणि विनायक दिवसेंदिवस कर्जाच्या खाईत बुडत गेला. त्याला स्वतःला यातून बाहेर पडायचे होते, पण त्या व्यसनाचा विळखा इतका घट्ट झाला होता की त्याची इच्छाशक्ती कमकुवत पडत चालली होती.

एक दिवस गावात एक महान आणि ज्ञानी साधू महाराज आले. विनायकच्या आईने आपल्या मुलाला घेऊन त्या साधू महाराजांची भेट घेतली आणि रडत रडत त्याची व्यसनाची सवय सांगितली. साधू महाराजांनी विनायकच्या डोळ्यात पाहिले, त्यांना त्याच्या मनात बाहेर पडण्याची असलेली सुप्त इच्छा दिसून आली. त्यांनी विनायकला म्हटले, उद्या सकाळी मला गावाबाहेरच्या बागेत एकट्याला येऊन भेट, मी तुला यातून सुटण्याचा उपाय सांगेन.

दुसऱ्या दिवशी सकाळी विनायक बागेत पोहोचला. साधू महाराज तिथे एका मोठ्या झाडाशेजारी उभे होते. विनायक जवळ येताच साधू महाराजांनी अचानक त्या झाडाच्या खोडाला दोन्ही हातांनी घट्ट मिठी मारली आणि ते मोठमोठ्याने ओरडू लागले, वाचवा! वाचवा! या झाडाने मला पकडले आहे! हे झाड मला सोडतच नाहीये!

विनायकला हे पाहून खूप आश्चर्य वाटले. तो म्हणाला, महाराज, तुम्ही हे काय करताय? झाडाने तुम्हाला पकडलेले नाही, उलट तुम्हीच तुमच्या हातांनी झाडाला घट्ट धरून ठेवले आहे. तुम्ही तुमचे हात मोकळे करा, झाड तुम्हाला आपोआप सोडून देईल.

साधू महाराजांनी विनायककडे पाहिले, स्मितहास्य केले आणि झाडाला सोडत शांतपणे म्हणाले, विनायक, हेच तर तुझ्या प्रश्नाचे उत्तर आहे.

कोणत्याही व्यसनाने तुला पकडलेले नाही, तर तू स्वतः तुझ्या मोहापोटी त्या व्यसनाला घट्ट धरून ठेवले आहेस. ज्या दिवशी तू मनात पक्का निश्चय करून तुझे हात (मोह) मागे घेशील, त्या दिवशी तू यातून मुक्त होशील. व्यसन स्वतः हून कधीच कोणाकडे येत नाही, आपणच त्याला कवटाळतो.

साधू महाराजांचे हे शब्द विनायकच्या थेट मनाला भिडले. त्याला समजले की मूळ समस्या व्यसनात नसून त्याच्या स्वतःच्या कमकुवत इच्छाशक्तीत आहे. त्याने त्याच क्षणी मनाशी पक्का निर्धार केला, जुन्या वाईट मित्रांची संगत सोडली आणि संपूर्ण लक्ष पुन्हा आपल्या कामावर केंद्रित केले. काही महिन्यांतच तो त्या मोहाच्या विळख्यातून पूर्णपणे बाहेर पडला आणि त्याचे आयुष्य पुन्हा आनंदी झाले.

तात्पर्य : व्यसन आपल्याला कधीच पकडत नाही, तर आपणच आपल्या कमकुवत मनामुळे व्यसनाला घट्ट धरून ठेवतो. दृढ इच्छाशक्ती, खंबीर निश्चय आणि योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर कोणत्याही वाईट सवयीचा विळखा तोडून बाहेर पडणे शक्य आहे.

## आत्मशक्ति



### एकरूप होणे

एकरूप होईपर्यंतची कहाणी आहे. ध्यान करतांना अंतरी दृष्टी लावून आम्ही खरे पहाता परमेश्वराच्या प्रेम महासागरात डुबकीच मारत असतो.

सियानाच्या संत कॅथेरीन ह्यांनी आपल्या आध्यात्मिक विवाहाबद्दल आम्हाला सांगितले आहे. अगदी बालपणापासून त्यांना आपल्या अंतरी अशी दिव्य दृश्ये पहाण्याचे भाग्य प्राप्त झाले होते. अशाच एका दृश्यात तिला आपले लग्न परमेश्वरांशी झालेले दिसले. सन १३६६ मध्ये तिला आकाशवाणी ऐकू आली, आज मी तुझ्या आत्म्याच्या विवाहाचा समारंभ साजरा करणार आहे. मी तुला पूर्वीच कबूल केले होते, आज मी तुझा पत्नी म्हणून स्वीकार करणार आहे.' पुन्हा तिला दिसले की, माता मरियमने तिचा हात हाती घेतला व येशूच्या हाती तो देत, त्यांचा विवाह साजरा केला. नंतर येशूने हिऱ्यांनी जडवलेली व मोती लावलेली सुंदर अंगठी कॅथेरीनच्या बोटात घातली व म्हटले, मी तुझ्याबरोबर विवाह करीत आहे.

येशू जे काही सुचवेल ती कामे कॅथेरीन करील, असे येशूने तिला सांगितले. त्याने स्पष्ट केले की ती आता पुरती धीट झाली आहे व आता सर्व कष्ट अगदी आनंदाने सहन करील. ते दृश्य दृष्टीआड झाले, परंतु त्या दिवसानंतर संत कॅथेरीनच्या बोटांत ती अंगठी सतत दिसू लागली.

चौदाव्या शतकात, मेस्टर एकार्हटचे जर्मन शिष्य 'महात्मा सूसो' ह्यांना सुध्दा त्यांच्या अंतरी परमेश्वराची दृश्ये पहाण्याचे भाग्य लाभले. त्यांनी सांगितले की, ते असेच एकदा पवित्र आत्म्याकडून घेरले गेले होते. त्यांनी त्यापैकी सर्वात जास्त

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### नम्रता

मिळतात. ते मिळवण्यासाठी वेगळे प्रयत्न करायची गरज पडत नाही. आणि हेच आशीर्वाद आपल्याला कल्पनेपलीकडे यशस्वी करतात.

देण्याचा अजून एक प्रकार म्हणजे इतरांवर आपलं मत न थोपवता फक्त ते मांडणं. जेव्हा आपल्याकडे अनुभव आणि समज असते आणि जेव्हा आपल्या आजूबाजूला काही चुकीचं घडताना दिसतं तेव्हा आपण आपलं मत मांडायलाच हवं. ते फेटाळलं जाणार असेल तरीही. पण असं मार्गदर्शन अत्यंत प्रेमाने आणि अप्रत्यक्षपणे करायला हवं.

सुरेश ओबेरॉय :

पूर्वी मी खूप निष्ठूरपणे बोलायचो. मी म्हणायचो, हे करू नको असं सांगितलं होतं मी तुला. आता हा कार्यक्रम केल्यानंतर मी नम्रतेने म्हणतो, जर मी तुझ्या जागी असतो तर ही गोष्ट मी या पद्धतीने केली नसती, पण तुम्ही तुमचे निर्णय घ्या. आता मी माझी मतं इतरांवर थोपवत नाही.

शिवानीदीदी : पण तुम्ही तुमचं मत देता.

सुरेश ओबेरॉय :

हो, मी देतो.

शिवानीदीदी :

म्हणजे काहीतरी देणं म्हणजे फक्त दान देणं असंच नाही. देण्याचे अनेक प्रकार आहेत - स्मितहास्य देणं, आशीर्वाद देणं, प्रशंसा करणं, आपलं ज्ञान वाटणं, जबाबदारी सोपवणं आणि आपला अनुभव तसंच समज इतरांना वाटणं.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

डॉक्टर : आजोबा, तुमचे दात कसे पडले?
आजोबा : अहो डॉक्टर, बायकोने कडक पोळी बनवली होती.
डॉक्टर : मग खायची नाकारायची ना?
आजोबा : तेच तर केलं... म्हणून तर दात पडले!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* मानवी शरीरातील सर्वात मोठी ग्रंथी कोणती आहे?

– यकृत

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आहारवेद – आरोग्य संवर्धन

### लहसूण


स्वयंपाकघरातील कोणतीही भाजी बनविताना लसणाची फोडणी दिल्याशिवाय ती भाजी रुचकर होत नाही. त्यामुळे प्रत्येक गृहिणीच्या घराबरोबर मनात लसणाने स्थान मिळविले आहे. अगदी प्राचीन काळापासून आयुर्वेदिक ग्रंथांमध्ये लसणाचे आरोग्याच्या दृष्टिकोनातून महत्त्व विशद केलेले आहे. आहार, औषधी, सौंदर्यप्रसाधने अशा विविध स्वरूपात लसणाचा वापर केला जातो. लसणाची उत्पत्ती मध्य आशियातील असून, अगदी प्राचीन काळापासून त्याची भारत, फिलिपिन्स, चीन, केनिया, ब्राझील, मेक्सिको अशा अनेक देशांत लागवड केली जाते. मराठीमध्ये 'लसूण', हिंदीमध्ये 'लहसुन', संस्कृतमध्ये 'लशून', इंग्रजीमध्ये 'गार्लिक', तर शास्त्रीय भाषेत 'एलिअम सटायव्हम' म्हणून ओळखला जाणारा लसूण हा 'लिलीएसी' कुळातील आहे. लसणाचे रोप कांद्याच्या रोपाप्रमाणेच एक ते दीड फूट उंचीचे असते. लसणाची लागवड करताना त्याचे बी नसल्यामुळे लसणाची पाकळी लावून लागवड करतात. त्यानंतर जमिनीत १० ते १५ कळांचा एकत्रित असा लसणाचा गड्डा तयार होतो. त्याचा आकार मोदकाप्रमाणे असतो. जमिनीच्यावर लसणाची पात (पाने) उंच, चपटी व अणकुचीदार येते. याचाही फोडणी देण्यासाठी उपयोग करतात. लसणाच्या पातीचे पिठले ही खरोखरच स्वादपूर्ण डिश असते.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# वारी पंढरपूरची

## संत श्रेष्ठ 'निवृत्तीनाथ महाराज'



महाराष्ट्राच्या भागवत धर्माचा विचार करताना संत बहिणाबाईंनी एका प्रसिद्ध अभंगात म्हटले आहे,

संतकृपा झाली। इमारत फळा आली।।
ज्ञानदेवे रचिला पाया। उभारिले देवालया।।

परंतु, हा पाया रचणाऱ्या ज्ञानदेवांना ज्यांनी घडवले, ते म्हणजे त्यांचे थोरले बंधू आणि सद्गुरू 'संत निवृत्तीनाथ महाराज'!

वारकरी संप्रदायाच्या मंदिराजवळ उभे राहून जेव्हा आपण कळसाकडे पाहतो, तेव्हा आपल्याला आदिनाथांपासून सुरू झालेल्या त्या दैवी परंपरेचे दर्शन होते, जिचे मुख्य प्रणेते निवृत्तीनाथ आहेत.

निवृत्तीनाथ हे केवळ एका थोर घराण्यातील मोठे भाऊ नव्हते, तर ते नाथ संप्रदाय आणि वारकरी संप्रदाय यांना जोडणारा सुवर्णसेतू होते.

बालपणी सोसावा लागलेला समाजाचा अनन्वित छळ, संन्याशाची मुले म्हणून कपाळावर मारलेला कलंक, पण त्याही परिस्थितीत धर्माची आणि भक्तीची घेतलेली ठाम भूमिका हा त्यांच्या चरित्राचा सुवर्णकाळ आहे. ज्ञानदेव, सोपानदेव आणि मुक्ताबाई या तिन्ही दिव्य आत्म्यांना समाधीस्थ होताना पाहिल्यानंतर, अत्यंत एकाकी अवस्थेतही त्यांनी भागवत धर्माचे कार्य पुढे चालू ठेवले.

संत निवृत्तीनाथांचा जन्म १३ व्या शतकात आपेगाव येथे गोदावरीच्या तीरावर सिद्धोपंत यांच्या घराण्यात, विठ्ठलपंत आणि रुक्मिणीबाई यांच्या उदरी झाला. विठ्ठलपंतांनी संन्यास सोडून पुन्हा गृहस्थाश्रम स्वीकारल्यामुळे तत्कालीन कर्मठ समाजाने या कुटुंबाला वाळीत टाकले होते. निवृत्तीनाथ हे चार भावंडांमध्ये सर्वात थोरले. त्यामुळे कुटुंबावर आणि लहान भावंडांवर होणाऱ्या अन्यायाची पहिली झळ त्यांनी स्वतः सोसली.

विठ्ठलपंत आपल्या कुटुंबासह त्र्यंबकेश्वर येथे आले असताना, एकदा रात्रीच्या वेळी ब्रह्मगिरी पर्वताच्या प्रदक्षिणेदरम्यान एक हिंस्र वाघ पाठीमागे लागला. त्या अंधारात आणि घाबरलेल्या वातावरणात बाल निवृत्तीनाथ आपल्या कुटुंबापासून दुरावले आणि ब्रह्मगिरीच्या एका दुर्गम गुहेत जाऊन पोहोचले. ती गुहा सामान्य नव्हती; तिथे साक्षात 'संत गहिनीनाथ' ध्यानस्थ बसले होते.

गहिनीनाथांनी या बालकाचे अद्भूत तेज ओळखले. त्यांनी निवृत्तीनाथांवर कृपेचा हात ठेवला आणि त्यांना 'नाथ संप्रदायाची' गुप्त आणि परम गूढ अशी शक्तीची दीक्षा दिली. गहिनीनाथांनी त्यांना आदेश दिला, निवृत्ती, हे मिळालेले ज्ञान केवळ स्वतः पुरते मर्यादित ठेवू नकोस. या दुःखी आणि भरकटलेल्या जगाला कृष्णभक्तीचा आणि नामस्मरणाचा मार्ग दाखव. हा प्रसंग निवृत्तीनाथांच्या आयुष्याला आणि पर्यायाने संपूर्ण महाराष्ट्राला बदलून टाकणारा ठरला.

गुहेतून बाहेर पडलेले निवृत्तीनाथ आता केवळ विठ्ठलपंतांचे ज्येष्ठ पुत्र नव्हते, तर ते एक सिद्ध पुरुष झाले होते. त्यांनी आपले हे ज्ञान आपले धाकटे बंधू ज्ञानदेव यांना दिले आणि त्यांचे गुरुपद स्वीकारले.

संन्याशाची मुले म्हणून जेव्हा चारही भावंडे पैठणच्या धर्मपीठाकडे 'शुद्धिपत्र' मागण्यासाठी गेली, तेव्हा तिथल्या कर्मठ ब्राह्मणांनी त्यांची अत्यंत टिंगलटवाळी केली. त्यांना उपहासाने म्हटले, तुम्हाला समाजात स्थान मिळणे अशक्य आहे. तुम्ही प्रायश्चित्त घेतले पाहिजे.

या अत्यंत कठीण प्रसंगात निवृत्तीनाथांनी अत्यंत ठाम आणि धीरोदात्त भूमिका घेतली. त्यांनी कुठेही राग किंवा सूडभावना व्यक्त केली नाही. निवृत्तीनाथांनी आपल्या भावंडांना सांगितले, ज्या समाजाला आपल्या आत्म्याचे ज्ञान नाही, त्यांच्यावर रागवून चालणार नाही. आपण आपल्या शुद्ध आचरणाने आणि भक्तीने या जगाला जिंकून घ्यायचे आहे. त्यांची ही ठाम वैराग्यवृत्ती पाहून पैठणचे ब्राह्मणही नंतर थक्क झाले.

त्यांनी शुद्ध आचरणाची घेतलेली हीच भूमिका पुढे चालून वारकरी संप्रदायाचा मुख्य नियम बनली, जिथे बाह्य कर्मकांडापेक्षा अंतःकरणाची शुद्धता श्रेष्ठ मानली गेली.

संत निवृत्तीनाथांच्या चरित्रात आणि लोकपरंपरेत त्यांच्या आध्यात्मिक अधिकाराचे अनेक चमत्कार सांगितले जातात. हे चमत्कार केवळ जादू दाखवण्यासाठी नव्हते, तर ते समाजाचा अहंकार मोडून त्यांना भक्तीच्या मार्गावर आणण्यासाठी होते.

पैठणमध्ये जेव्हा ब्राह्मणांनी ज्ञानदेवांच्या नावावरून त्यांची चेष्टा केली आणि एका समोरून जाणाऱ्या रेड्याला उद्देशून म्हटले, हा रेडा आणि तुमचा हा ज्ञानेश्वर एकच आहेत, तेव्हा निवृत्तीनाथांनी ज्ञानदेवांना त्यांच्या शक्तीची जाणीव करून दिली. निवृत्तीनाथांच्या आशीर्वादाने आणि सांगण्यावरून ज्ञानदेवांनी त्या रेड्याच्या मस्तकावर हात ठेवला आणि साक्षात त्या मूक प्राण्याच्या मुखातून वेदांचे ऋचा स्पष्टपणे बाहेर पडू लागल्या. या चमत्काराच्या मागे निवृत्तीनाथांचे गुरुबळ उभे होते.

१४०० वर्षे जगलेले आणि सिद्धीचा प्रचंड गर्व असलेले योगी चांगदेव जेव्हा वाघावर बसून आणि हातात सापाचा चाबूक घेऊन या चार भावंडांना भेटायला आले, तेव्हा हे चौघे जण एका साध्या भिंतीवर बसून ऊन खात होते. चांगदेवांना येताना पाहून निवृत्तीनाथांनी ज्ञानेश्वरांना मूक संमती देताच ज्ञानेश्वरांनी भिंतीला आज्ञा केली, चल, आपल्या पाहुण्यांना सामोरे जाऊ या! आणि साधी मातीची निर्जीव भिंत हवेत चालत पुढे गेली.

हा अद्भूत चमत्कार पाहून चांगदेवांचा अहंकार क्षणात गळून पडला आणि ते निवृत्तीनाथांच्या चरणी शरण आले.

वारकरी संप्रदायाचा जो मुख्य पाया आहे– 'ज्ञानेश्वरी'–या ग्रंथाच्या निर्मितीचे खरे श्रेय संत निवृत्तीनाथांना जाते. जर निवृत्तीनाथांनी ज्ञानदेवांना आज्ञा केली नसती की, ज्ञाना, गीतेचा अर्थ मराठीत (प्राकृत भाषेत) सांग, जेणेकरून सामान्य जनतेचे कल्याण होईल, तर आज आपल्याला ज्ञानेश्वरी सारखा अद्भूत ग्रंथ मिळाला नसता. नेवासे येथे ज्ञानेश्वरी पूर्ण झाल्यावर ज्ञानदेवांनी प्रत्येक अध्यायाच्या शेवटी आपल्या सद्गुरू निवृत्तीनाथांच्या चरणी कृतज्ञता व्यक्त केली आहे.

संत निवृत्तीनाथ यांच्या आयुष्यातील सर्वात कठीण, हृदयद्रावक आणि परीक्षा पाहणारा काळ म्हणजे त्यांच्या डोळ्यांदेखत त्यांच्या तिन्ही लहान भावंडांनी या इहलोकातून घेतलेली रजा! एका मोठ्या भावासाठी आणि गुरूसाठी हा प्रसंग अत्यंत जड होता.

कार्तिक वद्य त्रयोदशीला जेव्हा अवघ्या २१ व्या वर्षी संत ज्ञानेश्वर महाराजांनी आळंदी येथे संजीवन समाधी घेण्याचे ठरवले, तेव्हा संपूर्ण देहू–आळंदी परिसर रडत होता. नामदेव महाराजांनी या प्रसंगाचे अत्यंत आर्त वर्णन केले आहे. निवृत्तीनाथांनी आपल्या हाताने आपल्या लाडक्या शिष्याला आणि भावाला समाधीच्या गुहेत बसवले. समाधीची शिळा पुढे सरकवताना निवृत्तीनाथांच्या डोळ्यांतून वाहणारे अश्रू इंद्रायणीच्या पाण्यालाही हेलावत होते.

ज्ञानदेवांच्या समाधीनंतर अवघ्या काही दिवसांतच, मार्गशीर्ष महिन्यात धाकटे बंधू सोपानदेव यांनी सासवड येथे कऱ्हा नदीच्या तीरावर समाधी घेतली. पुन्हा एकदा निवृत्तीनाथांना आपल्या दुसऱ्या भावाला निरोप द्यावा लागला.

या दोन धक्क्यांमधून सावरत नाही तोच, त्यांची लाडकी बहीण आणि जिच्या अंगाखांद्यावर त्यांनी मातृत्वाचा आशिष पाहिला, ती मुक्ताबाई तापी नदीच्या तीरावर (एदलाबाद येथे) एका कडकडणाऱ्या विजेच्या प्रकाशात गुप्त झाली.

विचार करा, ज्या चार भावंडांनी एकत्र मिळून महाराष्ट्रात क्रांती घडवली, त्यातील तीनही भावंडे एका वर्षाच्या आत सोडून गेली. निवृत्तीनाथ आता पूर्णपणे एकाकी झाले होते. कोणताही सामान्य माणूस या दुःखाच्या आघाताने कोलमडून गेला असता. परंतु, निवृत्तीनाथ हे 'नाथ' होते. त्यांनी गहिनीनाथांना दिलेले वचन आठवले.

त्यांनी आपले वैयक्तिक दुःख बाजूला ठेवले. आळंदी, सासवड आणि तापी तीरावरून फिरून त्यांनी विखुरलेल्या वारकऱ्यांना एकत्र केले. भावंडे गेली तरी विठ्ठलाची वारी आणि भागवत धर्म थांबता कामा नये, ही ठाम भूमिका घेऊन त्यांनी पुढील काही महिने कीर्तन आणि उपदेशाचे कार्य अखंड चालू ठेवले. त्यांनी वारकरी संप्रदायाची विस्कळीत झालेली घडी पुन्हा बसवली.

सर्व कर्तव्ये पूर्ण झाल्यावर, आपल्या भावंडांनी सुरू केलेले कार्य सुरक्षित हातात सोपवल्यानंतर, संत निवृत्तीनाथांना आता या जगाचा निरोप घेण्याची ओढ लागली. त्यांना त्र्यंबकेश्वरची ती पावन भूमी आणि ब्रह्मगिरी पर्वताची गुहा आठवू लागली, जिथून त्यांच्या अध्यात्मिक प्रवासाची सुरुवात झाली होती.

जेष्ठ महिना उजाडला होता. निवृत्तीनाथ महाराज संत नामदेव आणि इतर प्रमुख वारकऱ्यांना सोबत घेऊन त्र्यंबकेश्वर येथे आले. उन्हाळा संपून पावसाचे आगमन होत होते. निसर्गही या महान संताला निरोप देण्यासाठी सज्ज झाला होता.

त्र्यंबकेश्वर येथील ब्रह्मगिरीच्या पायथ्याशी, जेथे आज त्यांचे भव्य मंदिर आहे, तिथे समाधीचा सोहळा ठरला. नामदेव महाराजांनी या प्रसंगाचे जे वर्णन केले आहे, ते वाचताना डोळे ओलावतात.

निवृत्तीनाथांनी गोदावरीत स्नान केले, समाधीच्या जागेची पूजा केली. त्यांनी उपस्थित वारकऱ्यांना आणि नामदेवांना शेवटचा उपदेश केला, नामा, विठ्ठल नामाचा गजर कधीही थांबू देऊ नका. चराचरात तो सावळ्या विठ्ठलच आहे, हे विसरू नका.

त्यानंतर निवृत्तीनाथ महाराज समाधीच्या जागेवर पद्मासन घालून बसले. त्यांनी आपले डोळे मिटले, प्राणायाम करून आपला प्राण ब्रह्मरंध्रात नेला. ज्ञानेश्वर, सोपान आणि मुक्ताबाई यांचे स्मरण करत त्यांनी आपली जीवनयात्रा संपवली. नामदेव महाराजांनी अत्यंत जड अंतःकरणाने त्यांच्या समाधीवर शिळा ठेवली.

ज्या त्र्यंबकेश्वरच्या डोंगरातून गोदावरीचा उगम होतो, त्याच त्र्यंबकेश्वरच्या मातीत वारकरी संप्रदायाचा हा महामेरू विलीन झाला.

आज जेव्हा आपण पंढरीच्या वारीला जातो आणि ज्ञानबा–तुकाराम असा गजर करतो, तेव्हा त्या 'ज्ञानबा' या नामाच्या मागे सद्गुरू म्हणून निवृत्तीनाथ उभे आहेत, हे आपण कधीही विसरता कामा नये. निवृत्तीनाथांचे चरित्र आपल्याला शिकवते की, प्रतिकूल परिस्थितीतही धर्माची आणि सत्याची बाजू कशी धरून ठेवायची. आणि आयुष्यात कितीही मोठे वैयक्तिक दुःख आले, तरी समाजाप्रती असलेले आपले कर्तव्य कसे सोडायचे नाही.

त्र्यंबकेश्वर येथे आजही ज्येष्ठ वद्य द्वादशीला निवृत्तीनाथांची मोठी यात्रा भरते. पंढरपूरच्या वारीमध्ये निवृत्तीनाथांची पालखी अत्यंत मानाने आणि निष्ठेने त्र्यंबकेश्वराहून निघून पंढरीला पोहोचते.


अशा या परम विठ्ठलभक्त, ज्ञानियांचे गुरू, भागवत धर्माचे मूळ पीठ आणि वारकरी संप्रदायाचे आद्य संत श्री निवृत्तीनाथ महाराजांच्या पावन चरणी ' कोटी कोटी दंडवत प्रणाम!



**रमेश देशपांडे**
९४२३७९३२२६

# प्रेरणादायी अक्षरधन

## दया तिचे नाव, भुतांचे पालन ।




अन्न जातेय वाया, म्हणून भुकेल्यांना म्हणायचं या, हे घ्याया. ही काय म्हणायची त्यांच्यावर दया? ही तर जाहिरातीची किमया. हा सगळा प्रयत्न प्रतिष्ठा मिळवाया. न झिजली काया, न खर्ची पडला रुपया हा निघालाय फुकटात लौकिक मिळवाया, दयावान म्हणून मिरवाया. जैन आचार्य कुन्दकुन्द आपल्या प्रवचनसारात म्हणतात.

तिसिदं वा भुक्खिदं वा दहिदं दडूण जो हिदुहिदमिणो । पडिवज्जिदंतं किवया तस्सेसा होदि अणुकम्मा ।।

मनी नाही माया, मग ती कसली दया? दिसला तहानलेला, पाहिला कुणी भुकेला, पडला नजरेला दुःखाने पीडिलेला, तर व्हावे दुःख स्वतःला. झटावे त्याचे दुःख दूर सारायला. अस्वस्थ व्हावे स्वतः, जणू ते दुःख होतेय आपल्याला. लागावे प्रयत्नाला. झटावे त्याची सेवा करायला. असावी मूळ दया. दया हा उत्स्फूर्त उमाळा.

संत तुकारामांना दयेचा अर्थ आणखी व्यापक करावासा वाटला. सर्व प्राणिमात्रांचे पालनपोषण समर्पक व्हावे, यासाठी झटणे, ही प्राणिमात्राबद्दलची दया होय. हे तर मूळ सूत्रच, पण ते म्हणाले, दया तिचे नाव भुतांचे पालन। आणिक निर्दळण कंटकांचे ।।

अनेक छुपे वैरी, जगाच्या सुखाला आड येणारी ज्यांची दुष्ट बुद्धी आणि छळणे हा ज्यांचा देहधर्मच, अशांचे निर्दालन करणे, ही देखील दयेची अंगभूत लक्षणे.

अरबस्थानात एक हातीमताई, नावाचा सरदार होता. खूप शूर, लढवय्या, पण दयाळू. त्याच्या पराक्रमापुढे कुणीही टिकेना. म्हणून त्याला अनेकांनी आपला सरदार केला. शेजारच्या भागात आणखी एक सरदार राहत होता. तोही शूर. पण मत्सर त्याच्या रोमारोमांत भरला होता. त्यापायी तो क्रूर बनला. हातीमताईचे वर्चस्व संपवायला त्यानं त्याच्यावर स्वारी करायचा बेत आखला.

हातीमताईला हे कळले. त्या दुष्ट सरदाराशी लढणे त्याला कठीण नव्हते. त्याने त्या क्रूराला सहज जिंकले असते. पण युद्ध म्हटले की, प्राणहानी होणार. अनेक जीव लुळेपांगळे होणार. त्याचे मन दयेने भरून आले. त्याने युद्ध टाळले. घरदार, धनदौलत टाकून देवून त्याने डोंगरदरम्यान पलायन केले तो दुष्ट सरदार आता हातीमातईच्या संपत्तीवर तुटून पडला. पण हातीमताई जिवंत सुटला म्हणून तो दुःखी झाला. मग त्या क्रूर सरदाराने हातीमताईला जिवंत पकडून देणाऱ्याला लाख दिनार इनाम देण्याची घोषणा केली. आपले शिपाई सरदार हातीमताईला पकडण्यासाठी दूरवर पाठवले, पण हातीमताई सापडेना.

एकदा वेषांतर करून फिरणाऱ्या हातीमताईला एक धोब्याचे जोडपे दिसले. भुकेने ते पिडले होते. दारिद्याने गांजले होते. हातीमताईला त्यांची दया आली. तो गहिवरून त्या जोडप्याला म्हणाला, मी आहे हातीमताई. मला त्या क्रूर सरदाराच्या स्वाधीन करा. अमाप द्रव्य इनाम मिळवा. तुमचे दारिद्र्य दूर करा. आनंदानं जगा.

धोब्याला लोभ सुटला. त्याच्या पत्नीने मात्र नकार दिला. पण त्याच वेळी शेजारून जाणाऱ्या त्या क्रूर सरदारांच्या शिपायांनी हा संवाद ऐकला. पुढे होऊन त्यांनी हातीमताईला पकडले.

हातीमताईला त्या क्रूर सरदारापुढे उभे केले. आम्ही त्याला पकडले म्हणून इनाम मागितले. पण तेवढ्यात धोबी तिथे आला. त्याने सगळी हकिगत सांगितली. हातीमताईच्या दयाळुपणाने तो भारावला होता. हातीमताईने स्वतःवर संकट ओढवून घेतले ते आपल्यासाठी, म्हणून तो धोबी स्वतःला दोष देत होता.

हातीमताईच्या या दयाळू प्रवृत्तीने त्या क्रूर सरदाराची भावना पालटली. तोही गहिंवरला. त्याने हातीमताईला मिठी मारली. तूच आमचा सरदार म्हणून त्याला गादी दिली.

दया सर्वांचे हित। सर्व पृथ्वी सुरक्षित।।

**– किशोर गांधी**

# शेख महंमद महाराज पालखीचे १७ जुलैला वाहिरातून प्रस्थान



नगर – श्रीक्षेत्र वाहिरा येथून संत शिरोमणी शेख महंमद महाराजांचा पालखी सोहळा १७ जुलै रोजी पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे. अनेक वर्षे खंडित झालेली ही परंपरा गेल्या तीन वर्षांपासून श्री संत शिरोमणी शेख महंमद महाराज प्रतिष्ठानच्या माध्यमातून पुन्हा सुरू करण्यात आली आहे.

संत शेख महंमद महाराज हे पांडुरंगाचे निस्सीम भक्त होते. त्यांच्या अभंगांतून पंढरी आणि वारीचे माहात्म्य जागतिक पातळीवर पोहोचले आहे. त्यांच्याच विचारांचा जागर करत यंदाचा सोहळा भक्ती, शिस्त, सेवाभाव आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश घेऊन पुढे जाणार आहे.

प्रतिष्ठानचे अध्यक्ष ह.भ.प. सिद्धीनाथ मेटे महाराज, सचिव किसन आटोळे सर, ह.भ.प. सोमनाथ मेटे महाराज, सुखदेव महाराज झांजे, सदाशिव पगारे सर, सोमनाथ शेलार, पोपट मेटे, विजय घोंगडे महाराज, राजेंद्र घोंगडे, गणेश माळशिकारे यांच्यासह पदाधिकारी आणि सेवेकरी या सोहळ्याची धुरा सांभाळत आहेत. पालखी मार्गावर दररोज काकड आरती, हरिपाठ, अखंड भजन, कीर्तन आणि प्रवचन होणार आहेत. टाळ–मृदंगाच्या गजरात वारकरी पंढरीच्या दिशेने वाटचाल करणार आहेत.

**पर्यावरण पूरक वारीवर भर :** या पालखीचे वैशिष्ट्य म्हणजे भक्तीसमवेत पर्यावरण रक्षण. गेल्या तीन वर्षांत प्रतिष्ठानने सुमारे १ हजार वृक्षांची लागवड केली आहे. यंदाही पालखीचे प्रस्थान वृक्षारोपणाने होणार असून, संपूर्ण मार्गावर वारी भक्तीची... पाऊलवाट पर्यावरण रक्षणाची हा संदेश देण्यात येणार आहे. पालखीच्या मुक्कामाच्या ठिकाणी स्वच्छता मोहीम राबवूनच पुढील प्रवास केला जातो. वारकऱ्यांसाठी शुद्ध पाणी, मोफत वैद्यकीय सेवा आणि साहित्य वाहतुकीची व्यवस्था करण्यात आली आहे. शाळा आणि सांस्कृतिक भवनांचा मुक्कामासाठी उपयोग केला जाणार आहे.

पालखी मार्ग : वाहिरा – कानडी–बेलगाव – नवसरवाडी – जातेगाव – खडकेवाडी – पांगरे – टेंभुर्णी – करकंभ मार्गे पंढरपूर.



आषाढी वारीदरम्यान नगरमध्ये येणाऱ्या दिंड्यांना आनंद गॅस एजन्सीने भारत गॅसचे घरगुती एलपीजी सिलिंडर नियोजनबद्ध पद्धतीने उपलब्ध करून दिले.

# आषाढी वारीतील वारकऱ्यांसाठी आनंद एजन्सीकडून भारत गॅस घरगुती एलपीजी सिलिंडरची विशेष सेवा

नगर – आषाढी वारीदरम्यान नगरमध्ये येणाऱ्या विविध पात्र दिंडींमधील अन्नछत्र अखंड सुरू राहावे आणि वारकऱ्यांना स्वयंपाकासाठी कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, या उद्देशाने आनंद गॅस एजन्सीने भारत गॅसचे घरगुती एलपीजी सिलिंडर नियोजनबद्ध पद्धतीने उपलब्ध करून दिले. दिंडींच्या गरजेनुसार वेळेवर सिलिंडर पुरवण्यासाठी एजन्सीची टीम प्रत्यक्ष मैदानात कार्यरत होती.

यामध्ये सागर तरटे, सरिता आंदे, सुनेना नांबियार आणि विजय पोटघंटे यांनी दिंडी प्रमुखांशी समन्वय साधत घरगुती एलपीजी सिलिंडरचे वितरण सुरळीत पार पाडले.

तसेच, चौपाटी करंजा मित्र मंडळ (ट्रस्ट) येथेही अन्नछत्रासाठी घरगुती एलपीजी सिलिंडर उपलब्ध करून देण्यात आले. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष महेश कुलकर्णी, उपाध्यक्ष सुचित भळगट तसेच महेंद्र तापकीरे, अमोल भंडारे, कैलास गहिले, सुरेंद्र सोनवणे, तेजस वैद्य, पुरुषोत्तम बुरसे, राहुल वरखेडकर, कृष्णा संबळ, बोजा अण्णा, मनीष भंडारे आणि ॲड. पराग देशमुख उपस्थित होते.

या उपक्रमामुळे वारकऱ्यांच्या अन्नछत्राची व्यवस्था विनाअडथळा सुरू राहिली.

# यांत्रिकी अभियांत्रिकी विषयात प्रा. डॉ. मंदार बिडवे यांना पीएच.डी

## लिथियम–आयन बॅटरी व्यवस्थापनावरील संशोधनाची राष्ट्रीय स्तरावर दखल



नगर – डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, अहिल्यानगर येथील यांत्रिकी अभियांत्रिकी विभागातील प्राध्यापक प्रा. डॉ. मंदार मारुती बिडवे यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांनी यांत्रिकी अभियांत्रिकी विषयात पीएच.डी. पदवी प्रदान केली आहे. पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या विषयावर त्यांनी केलेल्या संशोधनाला शैक्षणिक तसेच औद्योगिक क्षेत्रातून विशेष दाद मिळत आहे.

डॉ. बिडवे यांच्या संशोधनाचा विषय प्रॉडक्ट लाईफ सायकल नालिसिस अँड असेसमेंट ऑफ लिथियम–आयन बॅटरी फॉर प्रायॉरिटायझिंग द फॅक्टर्स ऑफ इफेक्टिव्ह फाइव्ह आर असा असून, हे संशोधन त्यांनी प्रा. डॉ. स्वानंद कुलकर्णी, एस. के. एन. सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले आहे.

पीएच.डी. संशोधनादरम्यान त्यांनी तीन आंतरराष्ट्रीय संशोधन निबंध प्रकाशित केले. त्यापैकी दोन निबंध स्कोपस–इंडेक्स्ड नियतकालिकांमध्ये, तर एक संशोधन निबंध एससीआय–इंडेक्स्ड 'जर्नल ऑफ एनर्जी स्टोरेज' या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या नियतकालिकात प्रसिद्ध झाला आहे. त्यांच्या संशोधनाची गुणवत्ता आणि उपयुक्तता यामुळे शैक्षणिक व संशोधन क्षेत्रात त्याची विशेष दखल घेण्यात आली आहे.

शैक्षणिक क्षेत्रातही डॉ. बिडवे यांचे योगदान उल्लेखनीय आहे. त्यांनी मुंबई विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ (बाटू), लोणेरे यांच्या अभ्यासक्रमासाठी प्रॉडक्ट डिझाईन अँड डेव्हलपमेंट, प्रॉडक्ट डिझाईन इंजिनिअरिंग आणि प्रॉडक्ट लाईफ सायकल मॅनेजमेंट या विषयांवरील अनेक संदर्भग्रंथांचे लेखन केले आहे. त्यामुळे अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी त्यांनी तयार केलेले साहित्य मार्गदर्शक ठरत आहे.

याशिवाय, गेल्या तीन वर्षांपासून ते राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) कार्यक्रम अधिकारी म्हणून कार्यरत असून सामाजिक बांधिलकी जपत विविध जनजागृती, पर्यावरण आणि सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवत आहेत.

डॉ. बिडवे यांनी आपल्या संशोधनातून भविष्यातील मोठ्या पर्यावरणीय समस्येकडे लक्ष वेधले आहे. वाढते वाहनप्रदूषण, कार्बन फूटप्रिंट, ग्लोबल वॉर्मिंग तसेच इलेक्ट्रिक वाहनांच्या वाढत्या वापरामुळे मोठ्या प्रमाणावर निर्माण होणाऱ्या लिथियम–आयन बॅटरींच्या विल्हेवाटीचा प्रश्न भविष्यात गंभीर ठरणार आहे. याच पार्श्वभूमीवर त्यांनी फाइव्ह आर (रिपेअर, रियूज, रिमॅन्युफॅक्चर, रिकव्हर आणि रिसायकल) या संकल्पनेवर आधारित प्रभावी फ्रेमवर्क विकसित केले आहे. या संशोधनाद्वारे वापरलेल्या लिथियम–आयन बॅटरींचे शाश्वत व्यवस्थापन, पुनर्वापर, संसाधनांचा कार्यक्षम वापर आणि पर्यावरण संरक्षणासाठी उपयुक्त उपाय सुचविण्यात आले आहेत.

या संशोधनामुळे पर्यावरण संवर्धन, शाश्वत विकास आणि भविष्यातील बॅटरी व्यवस्थापनाला नवी दिशा मिळणार असून, हा प्रबंध समाजोपयोगी आणि उद्योगक्षेत्रासाठीही अत्यंत उपयुक्त ठरेल, असे मत परीक्षकांनी नोंदविले आहे.

या यशाबद्दल महाविद्यालयाचे संचालक सुनिल कल्हापुरे, प्राचार्य डॉ. रविंद्र आर. नवथर, तसेच महाविद्यालयातीलशिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले. तसेच संस्थेचे चेअरमन डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय विखे पाटील आणि सेक्रेटरी जनरल डॉ. पी. एम. गायकवाड यांनीही डॉ. बिडवे यांच्या या शैक्षणिक यशाचे कौतुक करत पुढील संशोधन कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# नेप्ती सोसायटीत जिल्हा बँकेसाठी संजय जपकर यांच्या नावाचा ठराव

## आ.अक्षय कर्डिले यांच्या हस्ते सन्मान



नेप्ती येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आगामी निवडणुकीसाठी माजी सरपंच संजय जपकर यांच्या नावाने संचालक मंडळाने अधिकृत ठराव मंजूर केला निमित्त आमदार अक्षय कर्डिले यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

नगर – नगर तालुक्यातील नेप्ती येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आगामी निवडणुकीसाठी माजी सरपंच संजय जपकर यांच्या नावाने संचालक मंडळाने अधिकृत ठराव मंजूर केला आहे. सहकार क्षेत्रातील अनुभव, गावाच्या विकासासाठी केलेले कार्य आणि सभासदांशी असलेला सातत्यपूर्ण संपर्क याची दखल घेत संचालक मंडळाने हा निर्णय घेतला आहे.

या निर्णयानिमित्त आमदार अक्षय कर्डिले यांच्या हस्ते माजी सरपंच संजय जपकर यांचा फेटा बांधून, शाल व पुष्पगुच्छ देऊन जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी सोसायटीचे संचालक, पदाधिकारी, सभासद, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना संजय जपकर म्हणाले, नेप्ती विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या संचालक मंडळाने माझ्यावर दाखविलेला विश्वास आणि दिलेली जबाबदारी माझ्यासाठी अत्यंत मोलाची आहे. ही जबाबदारी पूर्ण प्रामाणिकपणे, पारदर्शकपणे आणि निष्ठेने पार पाडण्यासाठी मी कटिबद्ध आहे. सभासद, शेतकरी आणि सर्वसामान्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देत सहकार क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करेन. नेप्ती सोसायटी संचालकाचा विश्वास सार्थ ठरवणार असे प्रतिपादन संजय जपकर यांनी केले. ते पुढे म्हणाले, ही निवड माझी वैयक्तिक उपलब्धी नसून संपूर्ण नेप्ती गावाने आणि सोसायटीच्या संचालक मंडळाने माझ्यावर टाकलेल्या विश्वासाचे प्रतीक आहे.

आमदार अक्षय कर्डिले यांचे मार्गदर्शन, संचालक मंडळाचे सहकार्य आणि ग्रामस्थांचे पाठबळ याच्या बळावर जिल्हा बँकेच्या माध्यमातून शेतकरी व सभासदांच्या प्रश्नांसाठी प्रभावीपणे आवाज उठविण्याचे काम करेन. विकास, पारदर्शकता आणि सर्वसमावेशक सहकार हीच माझ्या कार्याची दिशा असेल.

# वाराणसी–अयोध्या–प्रयागराज तीर्थयात्रेचे श्रावण महिन्यानिमत्त खास आयोजन

## वाराणसीतील ८४ घाटांचे बोटीने दर्शन ठरणार विशेष आकर्षण

नगर – श्रावण महिन्याच्या निमित्ताने वाराणसी, अयोध्या आणि प्रयागराज या हिंदू धर्मातील प्रमुख तीर्थक्षेत्रांच्या दर्शनासाठी १७ ते २० ऑगस्ट या कालावधीत विशेष विमान तीर्थयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या यात्रेचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे वाराणसीतील ऐतिहासिक व धार्मिक महत्त्व असलेल्या सर्व ८४ घाटांचे बोटीने दर्शन घडविण्यात येणार आहे. याशिवाय काशी विश्वेश्वर मंदिर, कालभैरव मंदिर, प्रयागराज येथील त्रिवेणी संगम, बडे हनुमान मंदिर, अयोध्येतील श्री रामलला मंदिर, हनुमान गढी, कनक भवन, शरयू घाट आदी प्रमुख तीर्थस्थळांचे दर्शनही यात्रेत समाविष्ट करण्यात आले आहे. धार्मिक पर्यटनासोबतच या पवित्र स्थळांचा इतिहास, संस्कृती आणि अध्यात्माचा अनुभव घेण्याची संधी भाविकांना मिळणार आहे.

संपूर्ण यात्रा विमान प्रवासाद्वारे होणार असल्याने वेळेची मोठ्या प्रमाणात बचत होणार असून ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच कुटुंबांसाठी ही यात्रा विशेष सोयीची ठरणार आहे. अनुभवी मार्गदर्शक, नियोजनबद्ध दर्शन व्यवस्था आणि सुसूत्र कार्यक्रमामुळे भाविकांना कोणतीही गैरसोय होणार नसून शांत, सुरक्षित आणि समाधानकारक तीर्थयात्रेचा अनुभव मिळणार आहे.

या यात्रेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या भाविकांनी लवकरात लवकर नोंदणी करण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. अधिक माहितीसाठी आणि नोंदणीसाठी अभिजीत पोळ (मो. ९४२२२२७९०६) किंवा नंदकुमार पोळ (मो. ७८७५५०००५६) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या प्लॉट मिळकती या श्री. अरुण विष्णुपंत कुलकर्णी, श्री. प्रविण चत्रभुज बजाज, श्री. राहुल प्रविण बजाज, श्री. सुमित अशोक सोनवणे सर्व रा. बोल्हेगाव, अहिल्यानगर/अहमदनगर ४१४००१ या सर्वांनी श्री. नितीन विजय बारस्कर यांचे कडून गट/सर्व्हे क्र. ८६/१/हिस्सा क्र. ८/प्लॉट क्र. १/हिस्सा क्र. १ चे क्षेत्रफळ –३३००.०० चौ. मी. हे खरेदीखत दस्त क्र. ९४१६/२०२५ दि. २८.१२.२०२५ रोजी केलेल्या खरेदीखतानुसार खरेदी घेतले असून सदर मिळकती रेकॉर्डला म्हणजेच ७/१२ उताऱ्यावर विद्यपान मालकांचे नावाची नोंद फेरफार क्र. २४०९० अन्वये करण्यात आलेली आहे. तदनंतर घेण्यात आलेल्या एकत्रिकरण च सबडिव्हीजन परवानगी घेवुन त्याचा अंमल हा मा. तहसिलदार साहेब अहिल्यानगर यांच्या अदेशानुसार मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावर फेरफार क्र, २४४०८ नुसार घेण्यात आलेला आहे. खालील परिशिष्टात नमुद मिळकतीच्या विद्यमान मालक यांनी सदरच्या प्लॉट मिळकती या निर्वेध, निजोखमी असल्याबद्दल आमचे अशिलांस खात्री व भरवसा दिला आहे. सदरच्या प्लॉट मिळकती विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांना कायमखुष खरेदी देण्याचे ठरविले आहे, सदरच्या प्लॉट मिळकती या निर्वेध, निजोखमी असल्याबद्दलची खातरजमा करुन घेण्याच्या उद्दिष्टाने ही जाहिर नोटीस प्रसिध्द केली आहे. तरी सदर प्लॉट मिळकतीचे संदर्भात विद्यमान मालक श्री. अरुण विष्णुपंत कुलकर्णी, श्री. प्रविण चत्रभुज बजाज, श्री. राहुल प्रविण बजाज, श्री. सुमित अशोक सोनवणे या सर्वांचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही, कोणताही, हक्क, वारस हक्क, इजमेंट, पोटगी, मनाई हुकूम, अव्वल जप्ती, गहाण खत, डिपॉझीट ऑफ टायटल डिड नुसार इक्वीटेबल मॉर्गिज, चार्जे, साठेखत, बक्षीसपत्र, करार, आदलाबदल लेख, सोसायटीचे बोजे अथवा पतसंस्थेचे बोजे किंवा अन्य कोणताही हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रतिध्द झाल्यापासून **१५ दिवसांचे** आत त्यांचे हक्काबाबत योग्य त्या पत्रानिशी खालील नमुद केलेल्या पत्यावर कळवावे. मुदतीत कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरच्या मिळकतींवर अन्य कोणाचाही हक्क नाही, असे समजून अथवा असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिला
मे आहा धरुन आमचे अशिल विद्यमान मालकांबरोबर सदर प्लॉट मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाचीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

**परिशिष्ट**

डि।। अहिल्यानगर/अहमदनगर सब डि।।, ता. नगर पैकी मौजे बोल्हेगांव येथील अहिल्यानगर/अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सर्व्हे/गट नं. ८६/१/हिस्सा.क्र. ८ यामधील प्लॉट मिळकतीचे वर्णन व चतु:सिमा पुढीलप्रमाणे

| अ.नं. | प्लॉट नंबर | क्षेत्र आर. चौ.मी. | पुर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १/१ | २.१८.३७ | ९ मी. रोड | १२ मी. रोड | प्लॉट नं. १६ | प्लॉट नं. १/२ |
| २ | १/२ | १.४८.२६ | ९ मी. रोड | प्लॉट नं. १/१ | प्लॉट नं. १५ | प्लॉट नं. १/३ |
| ३ | १/३ | १.४८.२६ | ९ मी. रोड | प्लॉट नं. १/२ | प्लॉट नं. १४ | प्लॉट नं. १/४ |
| ४ | १/४ | १.४८.२६ | ९ मी. रोड | प्लॉट नं. १/३ | प्लॉट नं. १३ | प्लॉट नं. १/५ |
| ५ | १/५ | १.४८.२६ | ९ मी. रोड | प्लॉट नं. १/४ | प्लॉट नं. १२ | प्लॉट नं. १/६ |
| ६ | १/६ | १.४८.२६ | ९ मी. रोड | प्लॉट नं. १/५ | प्लॉट नं. ११ | प्लॉट नं. १/७ |
| ७ | १/७ | १.४८.२६ | ९ मी. रोड | प्लॉट नं. १/६ | प्लॉट नं. १० | प्लॉट नं. १/८ |
| ८ | १/८ | १.४४.०२ | ९ मी. रोड | प्लॉट नं. १/७ | प्लॉट नं. ९ | स. नं. ८५ पै. |

येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वक खुल्या प्लॉट मिळकती यातील तदंगभुत वस्तुसह, हक्कासह काही एक राखून न ठेविता.

**ॲड. यशवंत श्रीकृष्ण जोशी**
(बीएसएल, एलएलबी)
गाळा नं. १, गोदावरी कॉम्प्लेक्स, स्वागत झेरॉक्स, जुन्या जिल्हा न्यायालयासमोर, अहिल्यानगर मो. ९४२२३०४११०

अहिल्यानगर
दि. १५/७/२०२६

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेल्या प्लॉटस् मिळकती हया विद्यमान मालक **१. अमित संतोष फिरोदिया (एच.यु.एफ), २. संतोष शेषमल फिरोदिया (एच.यु.एफ), दोघेही रा. भंडारी सावज बिल्डींग, मार्केटयार्ड जवळ, पुनम मोती नगर, सावेडी, अहिल्यानगर., ३. रेश्मा हरेश बजाज, ४. वनिता दिलीप बजाज, ५. साहिल दिलीप बजाज, ६. हरेश चत्रुसिंग बजाज, नं. ३ ते ६ रा. दर्शन हाऊस, आशा हाऊसिंग सोसायटी, कृपाल आश्रम जवळ, सावेडी, अहिल्यानगर.** यांच्या मालकीच्या आहेत. विद्यमान मालक यांनी आमचे अशिलाबरोबर सदर प्लॉटस मिळकतींचा खरेदीचा व्यवहार ठरलेला असून, विद्यमान मालक यांनी विसारादाखल रक्कम स्वीकारलेली आहे. सदर प्लॉटस मिळकती विद्यमान मालक यांच्याच प्रत्यक्ष कब्जात व ताब्यात आहेत सदर प्लॉटस मिळकती पुर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असा खरेदी देणाराने म्हणजेच विद्यमान मालकाने खात्री व भरवसा दिला आहे. तथापि कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीज, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **७ दिवसाचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. तसेच हरकत न कळवीता परस्पर वर्तमान पत्रातुन जाहिर केलेल्या हरकतींची काही एक दखल घेतली जाणार नाही मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यानी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. ता. १५/०७/२०२६.

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**

जिल्हा अहिल्यानगर (अहमदनगर) पोट तुकडी व तालुका नगर पैकी अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्हा परिषद हद्दीतील मौजे **वडगांवगुप्ता** येथील **सर्व्हे नंबर ८०९/८१०/८११/ब२** मधील खालील वर्णनाचे खुले प्लॉटस मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

| प्लॉट नंबर | क्षेत्रफळचौ.मी. | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| १ | ४५३.१२ | ९ मीटर रस्ता | ३० मीटर डि. पी. रोड | लागू सर्व्हे नंबर | प्लॉट नं. २ |
| २ | १५१.४९ | ९ मीटर रस्ता | प्लॉट नं. १ | लागू सर्व्हे नंबर | प्लॉट नं. ३ |
| ३ | १५१.४९ | ९ मीटर रस्ता | प्लॉट नं. २ | लागू सर्व्हे नंबर | प्लॉट नं. ४ |
| ४ | १५१.४९ | ९ मीटर रस्ता | प्लॉट नं. ३ | लागू सर्व्हे नंबर | प्लॉट नं. ५ |
| ५ | १५१.४९ | ९ मीटर रस्ता | प्लॉट नं. ४ | लागू सर्व्हे नंबर | प्लॉट नं. ६ |
| ६ | १५१.४९ | ९ मीटर रस्ता | प्लॉट नं. ५ | लागू सर्व्हे नंबर | प्लॉट नं. ७ |
| ७ | १५१.४९ | ९ मीटर रस्ता | प्लॉट नं. ६ | लागू सर्व्हे नंबर | प्लॉट नं. ८ |
| ८ | १५१.४९ | ९ मीटर रस्ता | प्लॉट नं. ७ | लागू सर्व्हे नंबर | प्लॉट नं. ९ |
| ९ | १५१.४९ | ९ मीटर रस्ता | प्लॉट नं. ८ | लागू सर्व्हे नंबर | प्लॉट नं. १० |
| १० | १५१.४९ | ९ मीटर रस्ता | प्लॉट नं. ९ | लागू सर्व्हे नंबर | प्लॉट नं. ११ |
| ११ | १५१.४९ | ९ मीटर रस्ता | प्लॉट नं. १० | लागू सर्व्हे नंबर | प्लॉट नं. १२ |
| १२ | १५१.४९ | ९ मीटर रस्ता | प्लॉट नं. ११ | लागू सर्व्हे नंबर | प्लॉट नं. १३ |
| १३ | १५१.५९ | ९ मीटर रस्ता | प्लॉट नं. १२ | लागू सर्व्हे नंबर | १२ मीटर रस्ता |
| १४ | १५१.४८ | ९ मीटर रस्ता | १२ मीटर रस्ता | लागू सर्व्हे नंबर | प्लॉट नं. १५ |
| १५ | १५१.४८ | ९ मीटर रस्ता | प्लॉट नं. १४ | लागू सर्व्हे नंबर | प्लॉट नं. १६ |
| १६ | १५१.४८ | ९ मीटर रस्ता | प्लॉट नं. १५ | लागू सर्व्हे नंबर | प्लॉट नं. १७ |
| १७ | १५१.४८ | ९ मीटर रस्ता | प्लॉट नं. १६ | लागू सर्व्हे नंबर | प्लॉट नं. १८ |
| १८ | १५१.४८ | ९ मीटर रस्ता | प्लॉट नं. १७ | लागू सर्व्हे नंबर | प्लॉट नं. १९ |
| १९ | १५१.४८ | ९ मीटर रस्ता | प्लॉट नं. १८ | लागू सर्व्हे नंबर | प्लॉट नं. २० |
| २० | १५१.४८ | ९ मीटर रस्ता | प्लॉट नं. १९ | लागू सर्व्हे नंबर | प्लॉट नं. २२ |
| २१ | १५१.४८ | ९ मीटर रस्ता | प्लॉट नं. २० | लागू सर्व्हे नंबर | प्लॉट नं. २२ |
| २२ | १५१.४८ | ९ मीटर रस्ता | प्लॉट नं. २१ | लागू सर्व्हे नंबर | प्लॉट नं. २३ |
| २३ | १५१.४८ | ९ मीटर रस्ता | प्लॉट नं. २२ | लागू सर्व्हे नंबर | प्लॉट नं. २४ |
| २४ | १५१.४८ | ९ मीटर रस्ता | प्लॉट नं. २३ | लागू सर्व्हे नंबर | प्लॉट नं. २५ |
| २५ | १५१.४८ | ९ मीटर रस्ता | प्लॉट नं. २४ | लागू सर्व्हे नंबर | प्लॉट नं. २६ |
| २६ | १५१.४८ | ९ मीटर रस्ता | प्लॉट नं. २५ | लागू सर्व्हे नंबर | प्लॉट नं. २७ |
| २७ | १५१.४८ | ९ मीटर रस्ता | प्लॉट नं. २६ | लागू सर्व्हे नंबर | प्लॉट नं. २८ |
| २८ | १५१.४८ | ९ मीटर रस्ता | प्लॉट नं. २७ | लागू सर्व्हे नंबर | १२ मीटर रस्ता |
| ३३ | १३८.८६ | गट नं. ८१२ | प्लॉट नं. ३८ | प्लॉट नं. ३४ | ९ मीटर रस्ता |
| ३४ | १३८.३४ | प्लॉट नं. ३३ | प्लॉट नं. ३७ | प्लॉट नं. ३५ | ९ मीटर रस्ता |
| ३५ | १५४.९४ | प्लॉट नं. ३४ | प्लॉट नं. ३६ | ९ मीटर रस्ता | ९ मीटर रस्ता |
| ३६ | १५४.९४ | प्लॉट नं. ३७ | ९ मीटर रस्ता | ९ मीटर रस्ता | प्लॉट नं. ३५ |
| ३७ | १३८.३४ | प्लॉट नं. ३८ | ९ मीटर रस्ता | प्लॉट नं. ३६ | प्लॉट नं. ३४ |
| ३८ | १३८.३४ | गट नं. ८१२ | ९ मीटर रस्ता | प्लॉट नं. ३७ | प्लॉट नं. ३३ |
| ३९ | १३९.७० | गट नं. ८१२ | प्लॉट नं. ४४ | प्लॉट नं. ४० | ९ मीटर रस्ता |
| ४० | १३९.१५ | प्लॉट नं. ३९ | प्लॉट नं. ४३ | प्लॉट नं. ४१ | ९ मीटर रस्ता |
| ४१ | १५९.६९ | प्लॉट नं.४० | प्लॉट नं. ४२ | ९ मीटर रस्ता | ९ मीटर रस्ता |
| ४२ | १६१.१३ | प्लॉट नं. ४३ | १२ मीटर रस्ता | ९ मीटर रस्ता | प्लॉट नं.४१ |
| ४३ | १४१.८० | प्लॉट नं. ४४ | १२ मीटर रस्ता | प्लॉट नं. ४२ | प्लॉट नं. ४० |
| ४४ | १४१.८० | गट नं. ८१२ | १२ मीटर रस्ता | प्लॉट नं. ४३ | प्लॉट नं. ३९ |
| ४५ | १७१.३३ | प्लॉट नं. ४९ | प्लॉट नं. ४६ | ९ मीटर रस्ता | १२ मीटर रस्ता |
| ४६ | १७१.२९ | प्लॉट नं. ४९ | प्लॉट नं. ४७ | ९ मीटर रस्ता | प्लॉट नं.४५ |
| ४७ | १७१.२९ | प्लॉट नं. ५० | प्लॉट नं. ४८ | ९ मीटर रस्ता | प्लॉट नं. ४६ |
| ४८ | १७१.२९ | प्लॉट नं. ५० | ९ मीटर रस्ता | ९ मीटर रस्ता | प्लॉट नं. ४७ |
| ४९ | २८८.२२ | गट नं. ८१२ | प्लॉट नं. ५० | प्लॉट नं. ४५ व ४६ | १२ मीटर रस्ता |
| ५० | २८५.१५ | गट नं. ८१२ | ९ मीटर रस्ता | प्लॉट नं. ४७ व ४८ | प्लॉट नं. ४९ |

वर नमूद केलेल्या सर्व प्लॉटस् मिळकती.

**ॲड. सुचिता वाय. कुलकर्णी**
(बी.कॉम., एलएलबी) पत्ता– पारिजात कॉर्नर, ताबटकर मळा, गुलमोहोर रोड, सावेडी, अहिल्यानगर, मो– ९८९०६५४३००

# मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेसाठी १७ जुलैपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

नगर – मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना २०२६–२७ अंतर्गत नेवासा विधानसभा क्षेत्रातील विविध कामांसाठी पात्र कंत्राटदारांच्या नामनिर्देशनाची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. इच्छुक व पात्र कंत्राटदारांनी विहित नमुन्यात स्वतंत्र अर्ज १७ जुलै रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत बंद पाकिटात उपविभागीय अधिकारी, अहिल्यानगर यांच्या कार्यालयात समक्ष सादर करावेत, असे आवाहन उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांनी केले आहे.

मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना उपविभाग, अहिल्यानगर यांनी प्रसिद्ध केलेल्या सार्वजनिक सूचनेनुसार, जिल्हास्तरीय समितीने मंजूर केलेल्या प्रचलित तासिका दर (एल–१) दराच्या आधारावर कंत्राटदारांचे नामनिर्देशन करण्यात येणार आहे. योजनेसंदर्भातील जाहिरात, अटी–शर्ती, आवश्यक कागदपत्रांची माहिती तसेच अर्जाचा नमुना अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर तसेच उपविभागीय अधिकारी, अहिल्यानगर यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे. इच्छुक कंत्राटदारांनी विहित कालावधीत, शासकीय सुट्टीचे दिवस वगळून अर्ज सादर करावेत, असेही आवाहन करण्यात आले आहे.

## जाहीर प्रगटन

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस विशेषताः सदर मिळकतीचे विद्यमान मालक **विजयाबाई आप्पासाहेब आढाव रा. घर नं. ६८, समीर नगर कॉलनी, फकिरवाडा, अहिल्यानगर/अहमदनगर** यांना कळविणेत येते की,

**मिळकत वर्णन :** अ) डि. अहिल्यानगर अहमदनगर सब. डि. ता. नगर पैकी अहिल्यानगर/अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मौजे भिंगार येथील गोविंदपुरा भागातील सर्व्हे नं. ३४७/२ब मधील प्लॉट नं. ४५ याचे क्षेत्रफळ ३१०.०० चौ. मी. यावर बांधण्यात आलेल्या रो – हौसिंग स्कीम मधील विद्यमान मालक यांचे मालकीचा रो – हाऊस ब्लॉक नं. ६८ याचे प्लॉटचे क्षेत्रफळ २५.८३४५ चौ. मी. प्लॉट व त्यावर लोडबेअरींगमध्ये बांधकाम झालेले असुन यात दोन रुम, नळ कनेक्शन, लाईट कनेक्शन, लाईट फिटींग, हौद, टाकी, पुढे मागे मोकळी जागा, कंपाऊड, तदंगभूत वस्तुसह काही एक राखून न ठेविता.

**यासी चतुःसिमा**–
पुर्व – अंतर्गत रस्ता दक्षिण – विहीर
पश्चिम – स.नं. पैकी उत्तर – स.नं.३४३/१ पैकी प्लॉट नं.७३

वर नमुद केलेल्या मिळकती बाबत **आमचे अशिल वहिदा आबिद पठाण** यांनी विद्यमान मालक यांच्या बरोबर खरेदी विक्री करण्याचा व्यवहार करुन विसारापोटी भली मोठी रक्कम दिलेली आहे. तसेच विद्यमान मालक यांनी आमचे अशिल वहिदा आबिद पठाण यांच्या लाभात साठेखत लिहुन व नोंदवुन दिले आहे. तसेच आमच्या अशिलास नुकतीच खात्रीशीर माहिती मिळाली आहे की,विद्यमान मालक हे आमचे अशिल यांची फसवनुक करुन सदरची मिळकत इतर तिऱ्हाईत व्यक्तीस खरेदी देण्याचा प्रयत्न करीत आहे. सदर मिळकती बाबत कोणीही कोणतेही प्रकारचे खरेदी, विक्री, गहाण, दान, बक्षीस, साठेखत, लिव्ह अण्ड लायसेन्सी, कुलमुखत्यारपत्र, हस्तांतरणाचे कोणतेही प्रकारचे व्यवहार **विजयाबाई आप्पासाहेब आढाव** यांच्या बरोबर करु नये व सदर मिळकती बाबत व्यवहार केल्यास सदरचे व्यवहार व केलेले बेकायदेशीर दस्त आमचे अशिल वहिदा आबिद पठाण यांचेवर मुळीच बंधनकारक राहणार नाही व संबंधीतांना सदर मिळकतीची कुठल्याही प्रकारे कायदेशीर मालकी, ताबा, हितसंबंध व टायटल प्राप्त होणार नाही याची तमाम लोकांना जाहिर प्रगटनद्वारे कळविले असुन या उपरही कोणीही कोणतेही प्रकारचा व्यवहार विद्यमान मालक यांचे बरोबर केल्यास आमचे अशिल हे विद्यमान मालक यांच्या विरुध्द योग्य ती कायदेशीर कार्यावाही करतील व होणाऱ्या खर्चास व परीणामास विद्यमान मालक हे स्वत:हा जबाबदार राहतील.याची नोंद घ्यावी. विनाकारण कोणाचीही आर्थिक फसवणुक होऊ नये या उददेशाने आमचे अशिलाने सदर जाहिर प्रगटन प्रसिध्दीस दिले असे.

दि.१५/०७/२०२६
अहमदनगर.

**ॲड. नाजीम अहमद इस्माईल शेख**
(बीएएलएलबी)
**कुरेशी फैजान फारुक** (बीएएलएलबी, डीटीएल)
पत्ता– जुने कलेक्टर ऑफिसजवळ, डावरे गल्ली, अहमदनगर मो. ९८८१४३१८६०, ७२७६२५२४७८

## जाहीर नोटीस

तमाम लोकोस या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचा विक्रीव्यवहार आमचे अशिलांबरोबर होणार आहे व व्यवहाराची बोलणी चालु आहे. सदर मिळकत निर्वेध निजोखमी व बोजाविरहित आहे असे विद्यमान मालकाचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत्त येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बॅक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ दिवसाचे आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्राचे नकलासह आम्हांस कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार करतील; मग कोणाचीही तक्रार चालणार नाही. याची नोंद घ्यावी.
हि नोटीस प्रसिध्दीस दिली. ता. १५/०७/२०२६

परिशिष्ट मिळकतीचे वर्णन

मिळकत वर्णन : जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी नगरपैकी, महानगरपालिका हद्दीतील, शहर नगर येथील खालील वर्णनाची मिळकत.

| सि स नंबर | म्यु क नंबर | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| ५४७९ | ४२८०, ४२८१ | ७२९.१ चौ.मी. |

यापैकी पश्चिमेकडील १/२ भाग याचे क्षेत्र ३६४.५५ चौ.मी. यावर बांधलेल्या इमारतीचे नांव ''बी.के. कॉम्प्लेक्स'' यापैकी ग्राऊंड फ्लोअरवरील निवासी सदनिका (फ्लॅट) नंबर सी–३०४ याचे क्षेत्र ६०.४० चौ.मी, बिल्टअप हि मिळकत.

यासी चतु:सीमा –
पूर्वेस : पॅसेज दक्षिणेस : फ्लॅट नंबर सी–३१९
पश्चिमेस : सिसनंबर ५४८० उत्तरेस : फ्लॅट नंबर सी–३०३

विद्यमान मालकांचे नाव
१.श्रीमती शकुंतला गितेशचंद्र शिंगवी
२.श्री. नंदकिशोर गितेशचंद्र शिंगवी
दोघे रा. प्रभुआंगण अपार्टमेंट,
जुना बाजार, अहिल्यानगर

**ॲड. अभिषेक जैन (पगारिया)**
**ॲड. अंकिता अनिल शर्मा (पगारिया)**
चेंबर क्रमांक १०१, ॲडव्होकेट चेंबर, जुने जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर मो. ९५४५८७११११

## जाहीर नोटीस

क्र. कावि/फौज/एसआर/१०३/२०२६ अहिल्यानगर, दिनांक १०/७/२०२६

प्रति,
**श्रीमती जमीरोशन युसूफ सुरती** } ...अर्जदार
रा. घर नं. १५ पितळे कॉलनी,
स्नेह नगर, नागापूर एमआयडीसी
ता. जि. अहिल्यानगर
विरुद्ध } ...सामनेवाले
अधिकारी, जन्म मृत्यू नोंदणी विभाग,
अहिल्यानगर महानगरपालिका जि. अहिल्यानगर

ज्याअर्थी अर्जदार **श्रीमती जमीरोशन युसूफ सुरती,** यांनी सदरचा अर्ज जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अन्वये मा. अपर तहसिलदार अहिल्यानगर यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार नामे श्रीमती **जमीरोशन युसूफ सुरती** यांचे वडील नामे कै. युसूफ मुसा सुरती यांचा दि.२९/०१/२०२४ रोजी राहत्या घरी, नागापूर, ता. जि. अहिल्यानगर येथे मृत्यू झालेला आहे. त्यांचे मृत्यूची नोंद प्रतिवादी यांचेकडे होऊन तसे मृत्यू प्रमाणपत्र मिळणेकरीता सदरचा अर्ज मे. न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी अर्जदार नामे **श्रीमती जमीरोशन युसूफ सुरती** यांचे वडील नामे **कै. युसूफ मुसा सुरती** यांचा दि. २९/०१/२०२४ राहत्या घरी नागापूर ता. जि. अहिल्यानगर येथे मृत्यू झालेला नाही, असे जर कोणाचे म्हणणे असल्यास, त्यांनी या जाहीर नोटीस प्रसिद्धीचे दिनांकापासून १५ दिवसांचे आत आपली लेखी हरकत कागदपत्र पुरावे मा. अपर तहसिलदार अहिल्यानगर यांचे कार्यालयात सादर करावे. तसेच मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर कार्यालय अर्जदाराचा पुरावा घेऊन वर नमूद अर्जदार नामे **श्रीमती जमीरोशन युसूफ सुरती,** यांचे वडील नामे **कै. युसूफ मुसा सुरती** यांचा दि. २९/०१/२०२४ रोजी राहत्या घरी नागापूर, ता. जि. अहिल्यानगर येथे मृत्यूची नोंद सामनेवाला यांचेकडे घेऊन तसा दाखला अर्जदार यांना देण्याचा हुकूम करतील. तदनंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार गृहीत धरली जाणार नाही.
येणेप्रमाणे आज दिनांक १०/०७/२०२६ रोजी जाहीर नोटीस आज रोजी माझी सही व शिक्यानिशी दिली असे.

**स्वप्निल ढवळे**
अपर तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी अहिल्यानगर

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिशिष्ट वर्णन केलेली प्लॉट मिळकत ही विद्यमान मालक **बाबासाहेब अंबादास बारस्कर, चतुरभुज गुलाबराय खानचंदाणी, प्रशांत संभाजी निमसे व दिगंबर बबनराव भोसले सर्व रा, सावेडी, अहिल्यानगर** यांचे मालकी वहीवाटीची आहे सदर प्लॉट मिळकत त्यांच्या प्रत्यक्ष कब्जात आहे. खाली नमुद केलेल्या प्लॉट मिळकतीचा विक्रीचा व्यवहार आमच्या आशिलाबरोबर ठरला असून आमच्या आशिलाकडून विद्यमान मालक यांनी विसारापोटी रक्कम स्विकारलेली आहे. सदर प्लॉट मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजाविरहित आहे असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद मिळकत बाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा **साठेखत, खरदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास** ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन **सात (७)** दिवसाचे आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्यासह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन करुन द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर प्लॉट मिळकत निर्वेध, निजोखमी आहेत असे समजून खरेदीचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचाही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन** :–डि।। अहिल्यानगर सब डि।। तालुका नगरपैकी आहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्यक्षेत्रातील **मौजे भिस्तबाग येथील सर्व्हे नं. ४६/२/१पै मधील हिस्सा नं. ३९ प्लॉट नं. १ याचे क्षेत्रफळ १५०.०० चौ मी. ही संपूर्ण खुली प्लॉट मिळकत.**

**यांसी चतुःसिमा** :–
पुर्वेस : ९००मी. रुंदीचा रस्ता, दक्षिणेस : सर्व्हे नंबर ४६/१ पैकी,
पश्चिमेस :– सर्व्हे नंबर ४६/१ पैकी, उत्तरेस :– प्लॉट नंबर २,
येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक मिळकत दरोबस्त तदंगभुत सर्व वस्तुसुद्धा व इतर वागणुक वहिवाटीचे हक्कासह वरील मिळकत.
दिनांक :– १५/०७/२०२६, अहिल्यानगर

**ॲड. सुनिल गोरक्षनाथ हरीश्चंद्रे**
**ॲड. ओंकार पंडीत मोरे**
मो. ९८६०६४६४६३
ऑफिस– गाळा नं. ४, महालक्ष्मी चेंबर्स, पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर




जागतिक युवा कौशल्य दिनाच्या निमित्ताने आय.एस.डी.टी. या संस्थेत विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विनायक देशमुख.

# कौशल्य विकास व नाविन्यतेच्या माध्यमातूनच युवकांना उज्वल भवितव्य : विनायक देशमुख

**आय.एस.डी.टी.त जागतिक कौशल्य दिनानिमित्त कार्यशाळा**

नगर – सध्याच्या स्पर्धेच्या युगात देश विश्वगुरू होण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करत आहे. युवकांनी व्यावसायिक कौशल्य विकसित करून नाविन्यतेचा ध्यास घेतल्यास त्यांचे भवितव्य निश्चित उज्वल व समृद्ध होईल, असा विश्वास जिल्हा नियोजन समितीचे सदस्य व जिल्हा कौशल्य विकास समितीचे सदस्य विनायक देशमुख यांनी व्यक्त केला.

जागतिक युवा कौशल्य दिनाच्या निमित्ताने आय.एस.डी.टी. या संस्थेत विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना श्री. देशमुख बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर आय.एस.डी.टी. चे प्राचार्य आर्किटेक्ट अरुण गावडे, फॅशन डिझायनिंग विभागप्रमुख पूजा पतंगे, आर्किटेक्ट प्रणव भोसले, शिरीष गावडे, स्मिता बडाख, कोमल वांडेकर सारिका सपकाळ, रोहन चारगुंडी आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना श्री. देशमुख म्हणाले, सध्या केवळ एखादी पदवी मिळविणे पुरेसे नसून त्या क्षेत्रातील अतिरिक्त कौशल्य विकसित करणे आवश्यक आहे. देशातील प्रचंड युवाशक्ती लक्षात घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कौशल्य विकास कार्यक्रमावर विशेष भर दिला आहे. त्यामुळे आगामी काळात भारत देश कुशल युवाशक्ती असलेला देश म्हणून जगाच्या पाठीवर उदयास आल्याशिवाय राहणार नाही. केंद्र सरकारने आणि राज्य सरकारने उपलब्ध करून दिलेल्या विविध कौशल्य विकास कार्यक्रमांमध्ये युवक तसेच महिला मोठ्या संख्येने सहभागी सहभागी होत असून त्या माध्यमातून देश विश्वगुरू होण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करत आहे.

यावर्षीच्या कौशल्य दिनाचे कौशल्यातून सामूहिक विकास हे घोषवाक्य निश्चित करण्यात आले आहे. आय.एस.डी.टी. या संस्थेतील अभ्यासक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची कौशल्य विकासासोबत आर्थिक समृद्धीच्या दिशेने वाटचाल सुरु आहे. केवळ दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर दोन वर्षाचा फॅशन डिझाइनिंगचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर सध्या अनेक विद्यार्थिनी महिन्याला लाखापेक्षा जास्त उत्पन्न मिळवत आहेत. ही अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे. जास्तीत जास्त युवकांनी आणि मुलींनी व्यावसायिक शिक्षणाला प्राधान्य देऊन कौशल्य विकसित करावे, असे आवाहन श्री. देशमुख यांनी केले.

जिल्हा नियोजन समितीचे सदस्य या नात्याने बोलताना श्री. देशमुख यांनी सांगितले, जिल्ह्याच्या विकास आराखड्यात कौशल्य विकास कार्यक्रमासाठी किमान दहा कोटींच्या निधीची तरतूद करण्यात यावी, यासाठी आपण जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पा. व जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्याकडे आग्रह धरणार आहोत.

याप्रसंगी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीचा मशीन एम्ब्रॉयडरी हा अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यीनींना श्री. देशमुख यांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पूर्वा भंडारी यांनी तर आभार प्रदर्शन पुजा पतंगे यांनी केले.

## जाहीर नोटीस

क्र. कावि/फौज/एसआर/१०३/२०२६ अहिल्यानगर, दिनांक १०/७/२०२६

प्रति,
**श्रीमती जमीरोशन युसूफ सुरती** } ...अर्जदार
रा. घर नं. १५ पितळे कॉलनी,
स्नेह नगर, नागापूर एमआयडीसी
ता. जि. अहिल्यानगर
विरुद्ध } ...सामनेवाले
अधिकारी, जन्म मृत्यू नोंदणी विभाग,
अहिल्यानगर महानगरपालिका जि. अहिल्यानगर

ज्याअर्थी अर्जदार **श्रीमती जमीरोशन युसूफ सुरती,** यांनी सदरचा अर्ज जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अन्वये मा. अपर तहसिलदार अहिल्यानगर यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार नामे श्रीमती **जमीरोशन युसूफ सुरती** यांचे वडील नामे कै. युसूफ मुसा सुरती यांचा दि.२९/०१/२०२४ रोजी राहत्या घरी, नागापूर, ता. जि. अहिल्यानगर येथे मृत्यू झालेला आहे. त्यांचे मृत्यूची नोंद प्रतिवादी यांचेकडे होऊन तसे मृत्यू प्रमाणपत्र मिळणेकरीता सदरचा अर्ज मे. न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी अर्जदार नामे **श्रीमती जमीरोशन युसूफ सुरती** यांचे वडील नामे **कै. युसूफ मुसा सुरती** यांचा दि. २९/०१/२०२४ राहत्या घरी नागापूर ता. जि. अहिल्यानगर येथे मृत्यू झालेला नाही, असे जर कोणाचे म्हणणे असल्यास, त्यांनी या जाहीर नोटीस प्रसिद्धीचे दिनांकापासून १५ दिवसांचे आत आपली लेखी हरकत कागदपत्र पुरावे मा. अपर तहसिलदार अहिल्यानगर यांचे कार्यालयात सादर करावे. तसेच मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर कार्यालय अर्जदाराचा पुरावा घेऊन वर नमूद अर्जदार नामे **श्रीमती जमीरोशन युसूफ सुरती**, यांचे वडील नामे **कै. युसूफ मुसा सुरती** यांचा दि. २९/०१/२०२४ रोजी राहत्या घरी नागापूर, ता. जि. अहिल्यानगर येथे मृत्यूची नोंद सामनेवाला यांचेकडे घेऊन तसा दाखला अर्जदार यांना देण्याचा हुकूम करतील. तदनंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार गृहीत धरली जाणार नाही.
येणेप्रमाणे आज दिनांक १०/०७/२०२६ रोजी जाहीर नोटीस आज रोजी माझी सही व शिक्यानिशी दिली असे.

**स्वप्निल ढवळे**
अपर तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अहिल्यानगर

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेल्या बिनशेती प्लॉटस मिळकत विद्यमान मालक १) श्री.बाबासाहेब अंबादास बारस्कर, २) चतुरभुज गुलाबराय खानचंदाणी, ३) प्रशांत संभाजी निमसे व ४) दिगंबर बबनराव भोसले, सर्व रा. सावेडी, अहिल्यानगर यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असुन त्यांना सदर प्लॉटस मिळकती विक्री करण्यांचा पूर्ण हक्क व अधिकार आहे. त्यांनी आमचे अशिलांस कायमखुष खरेदी देण्यांचे ठरविलेले आहे. तसेच सदर प्लॉटस मिळकती हया निर्वेध निजोखमी व बोजारहीत, असल्याचे विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.

या उपरही सदर प्लॉटस मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा मनाई, दावा, लिज, गहाण, दान, बक्षिस,पोटगी हक्क, जनरल मुखत्यारपत्र, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन ७ दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्यावर संपूर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारचे तक्रार अगर हरकत चालणार नाही असल्यास त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजण्यांत येईल.

परिशिष्ट

१) मिळकत वर्णन : जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी नगरपैकी, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील, मौजे भिस्तबाग येथील सर्व्हे नं. ४६/२/१ पै मधील बिगरशेती प्लॉटस मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

| प्लॉट नंबर | हिस्सानं. | चौ.मी. | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| २९ | ३० | ९६.४३० | स. नं. ४७/१ पैकी क्षेत्र | प्लॉट नं. ३० | ९ मी. रस्ता | प्लॉट नं. २८ |
| ३० | ३१ | ६३.९२० | स. नं. ४७/१ पैकी क्षेत्र | प्लॉट नं. ३१ | ९ मी. रस्ता | प्लॉट नं. २९ |
| ३१ | ३२ | ६३.९०० | स. नं. ४७/१ पैकी क्षेत्र | प्लॉट नं. ३२ | ९ मी. रस्ता | प्लॉट नं.३० |
| ३२ | ३४ | ६३.८९० | स. नं. ४७/१ पैकी क्षेत्र | प्लॉट नं. ३३ | ९ मी. रस्ता | प्लॉट नं. ३१ |
| ३३ | ३५ | ६३.८७० | स. नं. ४७/१ पैकी क्षेत्र | प्लॉट नं. ३४ | ९ मी. रस्ता | प्लॉट नं. ३२ |
| ३४ | ३७ | ६३.८६० | स. नं. ४७/१ पैकी क्षेत्र | प्लॉट नं. ३५ | ९ मी. रस्ता | प्लॉट नं. ३३ |
| ३५ | ३८ | ६३.८५० | स. नं. ४७/१ पैकी क्षेत्र | प्लॉट नं. ३६ | ९ मी. रस्ता | प्लॉट नं. ३४ |
| ३६ | ४० | ६३.८३० | स. नं. ४७/१ पैकी क्षेत्र | प्लॉट नं. ३७ | ९ मी. रस्ता | प्लॉट नं. ३५ |
| ३७ | ४१ | ११७.७२० | स. नं. ४७/१ पैकी क्षेत्र | १२ मी. रस्ता | ९ मी. रस्ता | प्लॉट नं. ३६ |

येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वक काही एक राखून न ठेविता.
अहिल्यानगर
दि. १५/७/२०२६

**ॲड. स्वप्नील चंद्रशेखर भावसार**
(बीएसएल, एलएलबी)
पत्ता– फ्लॅट नं. ३०५, विजया रेसिडेन्सी, चितळे रोड, अहिल्यानगर, मो. ९०२८०२६३२६

# कॅलिडोस्कोप

## धावत्या गाडीत महिलेची प्रसूती



जिंदगी एक सफर है सुहाना... अभिनेता राजेश खन्नाच्या चित्रपटातील हे गाणं आयुष्याच्या प्रत्येक पाऊलावर आपल्याला जीनवप्रवासाची आठवण करून देतं. जगण्यातील आनंदी, दुःखी क्षणांची आठवण आणि साठवण या प्रवासात असते. असाच एक लक्षवेधी आणि आनंदी क्षण लोकमान्य टिळक टर्मिनस-दिब्रुगढ एक्सप्रेसमधील प्रवासात पाहायला मिळाला. एक्सप्रेसच्या धावत्या गाडीत महिलेची सुखरूप प्रसूती झाली अन् माता-पित्यासह रेल्वे कर्मचाऱ्यांचा जीव भांड्यात पडला. मध्य रेल्वेच्या रनिंग स्टाफ आणि प्रवाशांच्या मदतीने महिलेची यशस्वी प्रसूती झाली. भुसावळ आणि इटारसी स्थानकादरम्यान महिलेने गोंडस मुलाला जन्म दिला.

एलटीटी-दिब्रुगढ एक्सप्रेस भुसावळ आणि इटारसी रेल्वे स्थानकादरम्यान धावत असताना गर्भवती महिलेला प्रसूतीच्या कळा सुरू झाल्या. सुदैवाने आणि रेल्वे कर्मचाऱ्यांच्या मदतीने महिलेची प्रसूती यशस्वी झाली. प्रसूतीनंतर माता आणि तिच्या नवजात बालकाला हरदा येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

रेल्वेतील महिला प्रवासी ज्योती चौधरी यांना सायंकाळी सव्वापाच वाजता प्रसूती वेदना सुरू झाल्या, त्यांचे पती रवी चौधरी यांनी ट्रेन कंडक्टर एस. पी. फिरके आणि तिकीट तपासनीस (टीटीई) अंब्रीश कुमार तिवारी यांच्याशी संपर्क साधून मदत मागितली. प्रसूती वेदना सुरू झाल्यानंतर महिलेची प्रकृती झपाट्याने खालावत होती. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून रेल्वे कर्मचाऱ्यांनी तातडीने हालचाल केली. बी-६ डब्याच्या गॅलरीत ब्लँकेट आणि चादरींच्या साहाय्याने स्वच्छ व सुरक्षित जागा तयार करण्यात आली आणि गर्भवती महिलेला तेथे आरामदायी व्यवस्था करून देण्यात आली.

ऑन-ड्युटी कर्मचाऱ्यांनी भोपाल कंट्रोलला माहिती देत हरदा स्थानकावर डॉक्टर आणि रुग्णवाहिकेसह तातडीची वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्याची विनंती केली.

कंट्रोल रूमने तत्काळ हरदा येथे वैद्यकीय पथक सज्ज ठेवण्याचे आश्वासन दिले. दरम्यान, रनिंग स्टाफ आणि डब्यातील महिला प्रवाशांच्या मदतीने सायंकाळी धावत्या रेल्वेतच महिलेची सुरक्षित प्रसूती झाली आणि तिने एका निरोगी मुलाला जन्म दिला. ट्रेन सायंकाळी सहा वाजून सात मिनिटांनी हरदा स्थानकावर पोहोचली. तेथे आरपीएफ कर्मचारी, स्थानक कर्मचारी, महिला पोलिस शिपाई आणि मदतनीस वैद्यकीय सुविधांसह सज्ज होते. बाळाची नाळ अद्याप कापलेली नसल्याने माता आणि नवजात बालकाला तात्काळ रुग्णालयात हलविण्यात आले. दरम्यान, महिलेची प्रसूती यशस्वी झाल्याने, बाळ आणि माता सुरक्षित असल्याने सर्वांनाच आनंद झाला.

## रोबो मागतोय भीक!

आजवर आपण पैशांसाठी, अन्नासाठी, उपचारांसाठी किंवा इतर कारणांसाठी माणसांना भीक मागताना पाहिले असेल; मात्र रस्त्यावर बसून स्वतःचा 'रिचार्ज' करण्यासाठी भीक मागणारा रोबो पाहिलाय का? असा एक व्हिडीओ सध्या 'सोशल मीडिया'वर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून, त्याची अनोखी शैली पाहून नेटकऱ्यांमध्ये चांगलीच चर्चा रंगली आहे.

व्हायरल होत असलेल्या व्हिडीओमध्ये एक रोबो रस्त्याच्या कडेला हात जोडून बसलेला दिसतो. त्याच्या समोर एक भांडे ठेवले असून त्यात काही पैसे आहेत. तसेच डिजिटल पेमेंटसाठी एक क्यूआर कोडही ठेवण्यात आला आहे. रोबोजवळील स्पीकरमधून, 'माझा रिचार्ज करण्यासाठी पैसे नाहीत. कृपया वीज बिल भरण्यास मदत करा,' असा संदेश ऐकू येतो. त्यामुळे हा व्हिडीओ पाहणाऱ्यांचे चांगलेच मनोरंजन होत आहे. माहितीनुसार, हा रोबो चीनमधील 'युनिट्री' या रोबोटिक्स कंपनीने तयार केला आहे. याच कंपनीचा



एक रोबो या वर्षी इक्वेडोरमधील प्रसिद्ध 'चिंबोराझो'ज्वालामुखीवर चढल्यामुळे चर्चेत आला होता. आता त्याच कंपनीचा हा आणखी एक रोबो आपल्या वेगळ्या कृतीमुळे सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरला आहे.

हा व्हिडीओ एक्स (पूर्वीचे ट्विटर)वरील एका खात्यावरून शेअर करण्यात आला असून, लाखो लोकांनी तो पाहिला आहे. अनेकांनी त्यावर विनोदी प्रतिक्रिया दिल्या आहेत. 'काय काळ आला आहे, आता रोबोही भीक मागू लागले,' अशी प्रतिक्रिया एका नेटकऱ्याने दिली. दुसऱ्या एका वापरकर्त्याने, 'रोबोच्या नावाखाली दुसरेच कोणी भीक मागत असावे,' असा संशय व्यक्त केला, तर आणखी एका नेटकऱ्याने, 'हा कंपनीचा प्रसिद्धीचा स्टंट असू शकतो. चीनमध्ये अनेक कंपन्या आपल्या उत्पादनांचा प्रचार अशा भन्नाट पद्धतीने करतात,' असे मत व्यक्त केले आहे.



## भारताचा बदललेला भूगोल

भारताची सागरी किनारपट्टीची लांबी ३,५३७ किलोमीटरने वाढली आहे. म्हणजेच भारताची एकूण सागरी किनारपट्टी आता ११०९८.८१ किलोमीटर इतकी झाली आहे. भारताच्या या वाढलेल्या किनारपट्टीमुळे संशोधक अंचबित झाले आहेत. भारताची सागरी किनारपट्टी वाढण्यामागे अनेक कारणे समोर आली आहेत.

भारताच्या सागरी किनारपट्टीची लांबी ७,५६१.६० किमी इतकी असल्याचे आपण आतापर्यंत शालेय पुस्तकांमधून शिकलो आहोत. तसेच अधिकृत कागदपत्रांमध्येदेखील असाच उल्लेख आढळतो, पण आता भारताच्या सागरी सीमांच्या नवीन गणनेनंतर देशाच्या सागरी किनारपट्टीची लांबी ३,५३७.२१ किलोमीटर म्हणजेच सुमारे ५० टक्क्यांनी वाढल्याची धक्कादायक आकडेवारी समोर आली आहे. यामध्ये ऑफशोअर बेटे आणि इतर लहान-मोठ्या बेटांचादेखील समावेश आहे.

**सुधारित किनारपट्टी मोजणीला मान्यता**

ही बेटे जुन्या गणनेत समाविष्ट नव्हती. किनारी राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी या सुधारित आकृतीला एकमताने सहमती दर्शविली आहे. यामुळे भारताच्या भौगोलिक माहितीमध्ये हा मोठा बदल झाला आहे. केंद्रीय नौवहन मंत्रालयाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार, नवीन पद्धत वापरून केलेल्या गणनेनंतर सुधारित किनारपट्टीच्या लांबीला अधिकृतपणे मान्यता देण्यात आली आहे. भारताच्या सागरी किनारपट्टीच्या मोजणीचा वाद २०१० पासून सुरू होता. गृह मंत्रालयाच्या मते, १९७० पासून भारताच्या किनारपट्टीची लांबी ७,५६१ किलोमीटर आहे. विविध सरकारी विभागांनी किनारपट्टीसाठी वेगवेगळे आकडे वापरले आहेत. २०१९ मध्ये या मुद्द्याची तपासणी करण्यात आली. किनारपट्टी संवर्धन आणि विकास सल्लागार समिती २०१० पासून या मुद्द्यावर विचारविनिमय करत होती.

**प्रमाण आणि गणना पद्धतीत बदल**

विद्यमान किनारपट्टीच्या लांबीमध्ये इतक्या मोठ्या फरकाचे मुख्य कारण म्हणजे प्रमाण आणि गणना पद्धतीतील झालेला बदल आहे. वेगवेगळ्या स्केलच्या नकाशांवरून किनारपट्टीची लांबी मोजली जाते, तेव्हा त्यात फरक असू शकतो. नकाशा जितका मोठा आणि स्पष्ट असेल तितका लांबीचा डेटा अधिक अचूक असेल. आता केलेल्या गणनेमध्ये खाडी, किनारी बेटे आणि बेटे यासारख्या विविध रचनांचा समावेश आहे. मंत्रालयाच्या परिपत्रकानुसार, भारताच्या किनारपट्टीच्या लांबीमध्ये १,२९८ ऑफशोअर बेटे आणि बेटे समाविष्ट आहेत. यामध्ये १०५९ ऑफशोअर बेटे आणि २३९ बेटे आहेत. भारतातील मुख्य भूमीत समाविष्ट असलेल्या राज्यांमध्ये गुजरातच्या सागरी किनारपट्टीची लांबी सर्वाधिक आहे. गुजरातची किनारपट्टी २,३४०.६२ किलोमीटर आहे. त्याच वेळी पुदुचेरीच्या किनारपट्टीची लांबी सर्वात कमी म्हणजे ४२.६५ किलोमीटर आहे.



## ...म्हणून सुनेचे देवाला साकडे!


भारतीय कुटुंबव्यवस्थेत सासू-सुनेच्या नात्यातील मतभेद आणि तणाव हा अनेकदा चर्चेचा विषय ठरतो. अशाच एका वेगळ्या घटनेने सध्या 'सोशल मीडिया'वर लक्ष वेधले आहे. आंध्र प्रदेशातील एका महिलेने आपल्या सासूबद्दलची नाराजी व्यक्त करण्यासाठी थेट देवाकडेच साकडे घातल्याचा प्रकार समोर आला आहे.

ही घटना आंध्र प्रदेशातील अनंतपूर जिल्ह्यातील सुब्रमण्येश्वर स्वामी मंदिरात घडली. मंदिरातील दानपेटीतील रक्कम मोजताना कर्मचाऱ्यांना २० रुपयांची एक नोट सापडली. त्या नोटेवर एका महिलेने आपल्या सासूबद्दल संदेश लिहिला होता. त्या नोटेवर, 'स्वामी, माझ्या सासूकडून होणारा त्रास मला सहन होत नाही. कृपया तिला लवकर मृत्यू येऊ दे,' असा मजकूर लिहिलेला होता. हा संदेश वाचून मंदिरातील कर्मचारीही आश्चर्यचकित झाले. सामान्यतः देवस्थानांच्या दानपेट्यांमध्ये टाकलेल्या नोटांवर भाविक आपल्या कुटुंबाच्या सुख-समृद्धीसाठी, आरोग्यासाठी किंवा इतर सकारात्मक इच्छा लिहितात; मात्र या प्रकरणात एका महिलेने सासूबद्दलची तीव्र नाराजी व्यक्त केल्याने हा प्रकार चर्चेचा विषय ठरला आहे.

या घटनेचे फोटो 'सोशल मीडिया'वर व्हायरल झाल्यानंतर नेटकऱ्यांमध्ये संमिश्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत. काहींनी दुसऱ्याच्या मृत्यूची इच्छा व्यक्त करणे चुकीचे असल्याचे सांगत त्या महिलेवर टीका केली, तर काहींनी, एखाद्या महिलेला अशी भावना व्यक्त करण्यामागे ती किती मानसिक किंवा कौटुंबिक त्रासातून जात असेल, याचाही विचार केला पाहिजे, असे मत व्यक्त केले. दरम्यान, अशा प्रकारची घटना प्रथमच घडलेली नाही. यापूर्वी कर्नाटकातील कलबुर्गी येथील भाग्यवंती मंदिराच्या दानपेटीतही २० रुपयांच्या नोटेवर सासूच्या मृत्यूची इच्छा व्यक्त करणारा संदेश लिहिलेला आढळला होता.

## दागिन्यांचे प्रदर्शन पडले महाग

'सोशल मीडिया'वर महागडे दागिने आणि मौल्यवान वस्तूंचे प्रदर्शन करणे किती धोकादायक ठरू शकते, याचे उदाहरण मध्य प्रदेशातील 'सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर' आणि यूट्यूबर रचना गुर्जर यांच्या प्रकरणातून समोर आले आहे. त्यांच्या घरातून लाखो रुपयांचे दागिने आणि रोकड चोरीला गेल्यानंतर या घटनेची 'सोशल मीडिया'वर मोठी चर्चा सुरू झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मध्य प्रदेशातील शिवपुरी जिल्ह्यातील मोहनी गावातील रचना गुर्जर यांच्या घरात ही चोरी झाली. चोरट्यांनी पूर्वनियोजित पद्धतीने चोरी केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. रचना 'सोशल मीडिया'वर सोन्या-चांदीच्या दागिन्यांचे व्हिडीओ



नियमितपणे शेअर करत असल्याने, चोरट्यांनी ते व्हिडीओ पाहून घरातील मौल्यवान वस्तूंची माहिती मिळवली असावी, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. चोरीदरम्यान चोरट्यांनी घराबाहेरील कुंपण कापले. त्यानंतर त्यांनी घरात प्रवेश करून सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची दिशा बदलली, जेणेकरून त्यांचे चित्रीकरण होऊ नये.



## नोकरी सोडून कॅब बनला चालक

अनेकांना महिन्याच्या एक तारखेला मिळणाऱ्या पगाराची हमी देणारी नोकरी बरी वाटते, तर काही जणांना स्वतःच्या कामाचे तास फिक्स करण्याचे स्वातंत्र्य देणारा व्यवसाय महत्वाचा वाटतो. सकाळी ९ ते ५ काम करून नंतर सायंकाळी कुटुंबासोबत वेळ घालवणे याला काही लोक प्राधान्य देत असतात; मात्र एका तरुणाने सकाळी नऊ ते सायंकाळी पाच दरम्यानची २५ हजार रुपयांची नोकरी सोडून मोबाईल ॲप टॅक्सी चालवण्याचा निर्णय घेतला.

एका ग्राहकाने कॅब ड्रायव्हरला त्याच्या कमाई आणि जुन्या नोकरी संदर्भात प्रश्न विचारला. या गप्पांमध्ये ड्रायव्हर सांगतो, की तो आधी एका कंपनीत नोकरी करत होता. तिथे त्याला महिन्याला सुमारे २५ हजार रुपयांचे वेतन मिळत होते. यानंतर ग्राहक हसतच या तरुणाला विचारतो, मग आता एक लाख कमावत असशील? या प्रश्नावर ड्रायव्हरदेखील हसत उत्तर देतो, की पहिल्यापेक्षा त्याची कमाई खूपच चांगली आहे. जादा कमाईच्या शक्यतेनेच त्याने नोकरी सोडण्याचे म्हटले जाते.

ही चर्चा 'सोशल मीडिया'वर व्हायरल झाल्यानंतर लोकांचे आता दोन गट पडले आहेत. काही यूजर्सचे म्हणणे आहे, की मेहनतीच्या बळावर ही कमाई होत असेल तर स्वयंरोजगाराचा पर्याय चांगला असू शकतो. अनेक लोकांनी नोकरीला स्थिर उत्पन्नाची हमी, सामाजिक सुरक्षा आणि अन्य सुविधांचे महत्त्वदेखील असते.

## चित्रविचित्र वस्तूसंग्रहालये

भारतात चित्रविचित्र वस्तूसंग्रहालयं आहेत. अहमदाबादमधल्या व्हिचर वस्तूसंग्रहालयात बरीच भांडी बघायला मिळतात. या संग्रहालयात चार हजारपेक्षा अधिक भांडी मांडण्यात आली आहेत. ही सगळी भांडी विविध धातूंपासून बनवण्यात आली आहेत. प्राचीन काळातली भांडी इथे पहायला मिळतात. राजधानी दिल्लीत सुलभ आंतरराष्ट्रीय टॉयलेट म्युझियम आहे. इथे वेगवेगळ्या आकाराची शौचालयं पहायला मिळतात. हे संग्रहालय दिल्लीतलं खास आकर्षण आहे. इथे पुरातन शौचालयंही आहेत. हे संग्रहालय के. शंकर पिल्लई यांच्या संकल्पनेतून साकारलं आहे. दिल्लीतच एक बाहुल्यांचं संग्रहालय आहे. या संग्रहालयात अत्यंत सुंदर आणि आकर्षक बाहुल्या पहायला मिळतात. हे म्युझियमही के. शंकर पिल्लई यांच्या संकल्पनेतून साकारलं आहे. गुवाहाटीतल्या मायोंग गावात खूपच विचित्र संग्रहालय आहे. या संग्रहालयात मानवी कवट्या तसंच जादूटोण्यासाठी लागणाऱ्या वस्तू ठेवण्यात आल्या आहेत. जादूटोना संग्रहालय याच नावाने ते ओळखलं जातं.





## सात फेऱ्याअगोदरच वधूचा लग्नाला नकार



लग्नाचा मंडप सजवला होता. पुजारी मंत्र म्हणत होते. नातेवाइकांच्या नजरा वधू-वरांवर खिळल्या होत्या. वातावरण आनंदाने भरून गेले होते. पण फक्त सात फेरे शिल्लक असताना वधूने लग्न करण्यास नकार दिला.


आपल्याला हे लग्न करायचे नव्हते, असे तिने स्पष्ट सांगितले. कुटुंब, समाज किंवा नातेवाइकांची पर्वा न करता तिने आपला मुद्दा मांडला. हा निर्णय वधूने इतका अचानक सांगितला की सर्वांनाच धक्का बसला. अनेकांना आश्चर्य वाटले, तर काहींनी तिच्या धाडसाचे कौतुकही केले.

**नेमकं काय घडलं?**

कर्नाटकातील हसन जिल्ह्यातील बुवनहल्ली गावात ही घटना घडली. पल्लवी नावाच्या मुलीचे लग्न अलूर तालुक्यातील रहिवासी वेणुगोपालशी निश्चित झाले होते. सर्व नातेवाईक आनंदाने नाचत होते. वर हातात मंगळसूत्र घेऊन उभा होता आणि पुढच्याच क्षणी सात फेरे घ्यायचे होते तेव्हा पल्लवीने हा निर्णय घेतला आणि संपूर्ण वातावरणात शांतता पसरली.

**वधू तिच्या प्रियकरासह ...**

आपले प्रेम दुसऱ्या व्यक्तीवर आहे आणि आपले आयुष्य त्या व्यक्तीसोबतच घालवायचे आहे, असे तिने सांगितले. हे ऐकून मंडपात बसलेले लोक थक्क झाले. काही लोकांना सुरुवातीला काय घडत आहे यावर विश्वासच बसत नव्हता. मुलीच्या पालकांनी तिला समजावण्याचा खूप प्रयत्न केला. नातेवाइकांनीही आपापल्या परीने तिला समजावण्याचा प्रयत्न केला, पण पल्लवी डगमगली नाही. नंतर पल्लवीचा प्रियकर पोलिसांसह तिथे पोहोचला आणि वधूला सोबत घेऊन गेला.



## पुरातन ठेवा परत मिळाला

संगीतकार स्टिफन मॉरिस यांना त्यांचं हरवलेलं व्हायोलिन हे वाद्य परत मिळालं आहे. लंडनच्या दक्षिण भागात रेल्वेने प्रवास करताना त्यांचं व्हायोलिन हरवलं होतं. हे व्हायोलिन ३१० वर्षांपूर्वीचं असल्यामुळे मॉरिस यांच्या जीवाची घालमेल सुरू होती. जुन्या काळातलं व्हायोलिन परत मिळू शकत नसल्याने ते खूपच अस्वस्थ झाले होते. मात्र १० दिवसांनी त्यांना व्हायोलिन मिळालं. या पुरातन व्हायोलिनची किंमत थोडीथोडकी नाही. हे वाद्य खरेदी करण्यासाठी तुम्हाला २.५ लाख पाउंड म्हणजे जवळपास २.२८ कोटी रुपये द्यावे लागतील. व्हायोलिनची ही किंमत ऐकून कोणीही उडेल. डेव्हिड टेक्लर यांनी १७०९ मध्ये हे व्हायोलिन तयार केलं होतं. स्टिफन यांनी आपलं व्हायोलिन हरवल्याची तक्रार दाखल केली होती. त्यानंतर पोलीस कामाला लागते. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचं फुटेज तपासून त्यांनी आरोपीला ओळखलंही होतं. ही माहिती मिळताच फक्त २४ तासांमध्ये आरोपीने स्टिफन मॉरिस यांच्याशी ट्विटरवरून (एक्स) संपर्क साधला आणि व्हायोलिन परत देणार असल्याचं सांगितलं. ठरवलेल्या ठिकाणी रात्री दहा वाजून दहा मिनिटांनी स्टीफन यांना व्हायोलिन मिळालं. व्हायोलिन परत केल्यामुळे आरोपीला ताब्यात घेणार नसल्याचं लंडन पोलिसांनी सांगितलं.

# पीसीएम-पीसीबी विद्यार्थीसुद्धा बीसीए प्रवेशासाठी आता पात्र

## प्रवेशाची संधी; न्यू आर्ट्स महाविद्यालयात विशेष मदत केंद्र



प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे

नगर - न्यू आर्टस, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगरचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी बीसीए प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची माहिती दिली आहे. तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्या निर्देशानुसार, आता बीसीए अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी पात्रतेचे निकष अधिक व्यापक करण्यात आले असून, इंजिनिअरिंग किंवा मेडिकलची प्रवेश परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांनाही आता प्रवेशाची संधी मिळणार आहे.

प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, तंत्रशिक्षण विभागाने २३ मे रोजी जारी केलेल्या परिपत्रकानुसार, ज्या विद्यार्थ्यांनी बीसीए किंवा बीबीए-बीसीए साठी स्वतंत्र प्रवेश परीक्षा दिली आहे, त्यांना प्रथम प्राधान्य दिले जाईल. मात्र, त्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांवर इंजिनिअरिंग (PCM) किंवा मेडिकल (PCB) ची सीईटी (CET) परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांनाही प्रवेश घेण्यास परवानगी देण्यात आली आहे. तंत्रशिक्षण विभागाने घेतलेला हा निर्णय तांत्रिक शिक्षण घेण्यास इच्छुक असलेल्या अनेक विद्यार्थ्यांसाठी अत्यंत दिलासादायक ठरला आहे.

प्राचार्य डॉ. सागडे यांनी सांगितले की, बीसीए प्रवेश प्रक्रियेसाठी महाविद्यालयाच्या संगणक विभागात विशेष 'हेल्प डेस्क' सुरू करण्यात आला आहे. नोंदणीसाठी १६ जुलै ही अंतिम मुदत असून इच्छुक विद्यार्थी आणि पालकांनी या संधीचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी आणि मार्गदर्शनासाठी विद्यार्थ्यांनी विभागप्रमुख प्रा. अरुण गांगर्डे (९४२२२२४४४०) यांच्याशी संपर्क साधावा.

महाविद्यालयातील कॅंसास (Center For Advanced Studies in Applied Sciences) विभाग अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज असलेल्या प्रयोगशाळांसाठी प्रसिद्ध आहे, जिथे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून शिकण्याची संधी मिळते. अध्यापनाचा दर्जा उत्कृष्ट राखण्यासाठी येथे अत्यंत पात्र आणि अनुभवी प्राध्यापकांचा संच कार्यरत असून, ते विद्यार्थ्यांना सातत्याने मार्गदर्शन करत असतात. याव्यतिरिक्त, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण अभ्यासासाठी आवश्यक असलेली अद्ययावत आणि समृद्ध ग्रंथालय सुविधा ही आमच्या विभागाची मोठी ओळख आहे. उच्च गुणवत्तेचे शिक्षण आणि वैचारिक प्रगल्भतेसाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील असतो.

या सर्व सोयी-सुविधांमुळे विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक युगात टिकून राहण्यासाठी आवश्यक ते भक्कम पाठबळ मिळते अशी माहिती डॉ. सागडे यांनी दिली.



सन २०२६ च्या बहुप्रतीक्षित 'समर्पण चातुर्मास' पर्वाची उत्साहपूर्ण नांदी ठरलेल्या समर्पण जैन धर्मयात्रेचे सप्तकसदन, खिस्त गल्ली येथे स्वागत करण्यात आले.

# समर्पण धर्मयात्रेत स्थानकवासी-मंदिरमार्गी जैन संप्रदायाचे अभूतपूर्व ऐक्य

## सप्तकसदन येथे जैन बांधवांच्या उपस्थितीत धर्मजागृतीचा प्रेरणादायी सोहळा; समर्पण चातुर्मासाची उत्साहपूर्ण नांदी

नगर - सन २०२६ च्या बहुप्रतीक्षित 'समर्पण चातुर्मास' पर्वाची उत्साहपूर्ण नांदी ठरलेल्या समर्पण जैन धर्मयात्रेचे १३ जुलै रोजी शहरातील सप्तकसदन, खिस्त गल्ली येथे मंगलमय वातावरणात आणि जयघोषाच्या गजरात स्वागत करण्यात आले. धर्मजागरणाचा संदेश देणाऱ्या या धर्मयात्रेत जैन बांधवांनीसहभाग नोंदवत धार्मिक ऐक्य, श्रद्धा आणि समर्पणाची प्रेरणादायी अनुभूती घेतली.

श्री प्रवीणऋषी म.सा. यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या धर्मयात्रेला श्री तिर्थेश ऋषीजी म.सा., मंदिरमार्गी परंपरेतील श्री ज्ञानप्रेम विजयजी म.सा. आणि श्री हितप्रेम विजयजी म.सा. यांची प्रमुख उपस्थिती लाभली. विविध भागांतून मोठ्या संख्येने सहभागी झालेल्या जैन समाजाने धर्मयात्रेला अभूतपूर्व प्रतिसाद दिला.

सकल जैन समाज बुरुड गल्ली, खिस्त गल्ली, हलवाई गल्ली, जुना बाजार, चर्च रोड आणि परदेशी गल्ली यांच्या वतीने आयोजक बाळासाहेब भंडारी, किरण शिंगी, पवन गुंदेचा, सचिन चोपडा व समाजबांधवांनी धर्मयात्रेचे भावपूर्ण स्वागत केले.

या धर्मयात्रेचे विशेष आकर्षण म्हणजे कापडबाजार जैन मंदिरात मंदिरमार्गी जैन समाजाच्या वतीने आयोजित करण्यात आलेले स्वागत. श्री ज्ञानप्रेम विजयजी म.सा. व श्री हितप्रेम विजयजी म.सा. यांच्या उपस्थितीत श्री प्रवीणऋषी म.सा. व श्री तिर्थेशऋषीजी म.सा. यांचे सन्मानपूर्वक स्वागत करण्यात आले. त्यानंतर मंदिरमार्गी आणि स्थानकवासी समाजातील सर्व श्रद्धाळू एकत्रितपणे धर्मयात्रेत सहभागी झाले. हा प्रसंग जैन समाजासाठी अत्यंत दुर्मिळ, प्रेरणादायी आणि ऐतिहासिक ठरला.

धर्मसभेच्या प्रारंभी बाळासाहेब भंडारी यांनी प्रास्ताविक केले. त्यानंतर सौ. राखी गांधी, सौ. स्मिता बोगावत, स्वाती चोपडा आणि सौ. पूजा चुत्तर यांनी सुमधुर स्वागतगीत सादर करून उपस्थितांना भक्तिरसात चिंब केले.

समर्पण चातुर्मास समितीचे अध्यक्ष बाबुशेठ बोरा यांनी आपल्या मनोगतात समर्पण चातुर्मासातील विविध धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांची सविस्तर माहिती देत सर्व समाजबांधवांनी प्रत्येक कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले. यावेळी संदीप गांधी यांनीही मनोगत व्यक्त केले.

त्यानंतर श्री प्रवीणऋषी म.सा., श्री ज्ञानप्रेम विजयजी म.सा. आणि श्री हितप्रेम विजयजी म.सा. यांनी धर्मजागृती, धर्माचरण, संस्कार, आत्मोन्नती आणि सामाजिक ऐक्य या विषयांवर अत्यंत प्रभावी मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रेरणादायी विचारांनी उपस्थितांना धर्माचरणाची नवी दिशा दिली.

यानंतर श्री तिर्थेशऋषीजी म.सा. यांनी आपल्या मधुर स्वरात सादर केलेल्या भावपूर्ण धर्मभजनाने संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले. मंगलपाठानंतर आयोजित नवकारसी कार्यक्रमाने धर्मसभेची सांगता झाली.

या संपूर्ण कार्यक्रमाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे स्थानकवासी आणि मंदिरमार्गी या दोन्ही जैन परंपरांतील महाराज साहेबांनी धर्मयात्रा आणि धर्मसभेत एकत्र सहभागी होत अखिल भारतीय जैन समाजासमोर ऐक्याचा प्रेरणादायी आदर्श निर्माण केला. अहिल्यानगरमध्ये कोणताही पंथवाद नसून सकल जैन समाज एक आहे हा अत्यंत सकारात्मक आणि ऐतिहासिक संदेश या सोहळ्यातून संपूर्ण देशभर पोहोचला.

कार्यक्रमास कापडबाजार जैन मंदिराचे अध्यक्ष सुभाष मुथा, शैलेश मुनोत, अनिल पोखरणा, विलास कटारिया, इश्वर बोरा, संदीप गांधी यांच्यासह नागापूर, सावेडी, महावीरनगर, सिव्हिल हडको, भिंगार, विनायकनगर आणि केडगाव श्रीसंघांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विविध भागांतील हजारो जैन समाजबांधव उपस्थित होते. दुपारच्या सत्रात महिला व युवतींसाठी, तर रात्री पुरुष व युवकांसाठी स्वतंत्र विशेष धर्मचर्चा सत्रांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमांनाही प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी बाळासाहेब भंडारी, किरण शिंगी, पवन गुंदेचा, सचिन चोपडा, रोहित चंगेडे, राहुल कटारिया, सचिन कटारिया, प्रशांत गांधी, पराग गांधी, अभिजीत चंगेडे, सचिन डागा, सार्थक चोपडा, साहील चोपडा आणि आनंद भंडारी यांनी परिश्रम घेतले.

# विचार भारतीतर्फे शालेय विद्यार्थ्यांमधील विशेष कौशल्याच्या शोधासाठी २६ जुलैला विशेष कार्यशाळा



डॉ.सागर देशपांडे ॲड. विक्रम एडके

नगर - अहिल्यानगरच्या विचार भारतीच्या वतीने इयत्ता ५ वी ते १० वी विद्यार्थ्यांमधील विशेष कौशल्य शोधून त्यांच्या भावनिक बुद्धिमत्तेच्या माध्यमातून विकासासाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन केले आहे. ही कार्यशाळा २६ जुलै रोजी सावेडीच्या रेणावीकर हायस्कूल मधील सभागृहात होणार आहे. यामध्ये लेखक व वक्ते डॉ.सागर देशपांडे, गीतकार व व्याख्याते ॲड. विक्रम एडके यांच्यासह विविध क्षेत्रांतील अभ्यासू व्यक्तिमत्व सहभागी विद्यार्थ्यासह शिक्षकांना व पालकांना विविध सत्रांमध्ये मार्गदर्शन करणार आहेत, अशी महिती कार्यशाळेचे प्रमुख मिलिंद कुलकर्णी यांनी दिली.

अधिक माहिती देताना सुधीर लांडगे म्हणाले, २६ जुलैला सकळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत होणाऱ्या या कार्यशाळेतील तीन सत्रे पालक आणि विद्यार्थ्यांचे संयुक्त असतील आणि दोन सत्र विभक्त असतील. विद्यार्थ्यांसमोर आता कृत्रिम बुद्धिमत्ता आणि चॅट जीपीटी या नव्या तंत्रज्ञानाचे आव्हान नव्याने उभे राहत आहे. त्याला उत्तर शोधून हे तंत्रज्ञान आत्मसात पण करावे लागणार आहे. यासाठीच विद्यार्थ्यांमधील विशेष कौशल्य शोधण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन केले आहे. य कार्शाळेसाठी इयत्ता ५ वी ते १० वी मधील मर्यादित विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना प्रवेश देण्यात येणार आहे. यासाठी नावनोंदणी आवश्यक आहे.

या कार्यशाळेत वक्तृत्व व वादविवाद, नाट्य व कथाकथन, संगीत व नृत्य, चित्रकला, हस्तकला व शिल्पकला, निबंध व काव्य लेखन या कालांसह विविध खेळ व मैदानी क्रीडाप्रकार आदींबाबत मार्गदर्शन करण्यासाठी सर्व क्षेत्रातील तज्ज्ञांना पाचारण करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी मिलिंद कुलकर्णी ९७६३७१८७४१. महेंद्र जाखेटे ८५५४९०००८२ व विशारद पेटकर ९२२५३०२०३८.

# अहिल्यानगरमध्ये १६ जुलै रोजी मोफत हृदयरोग तपासणी शिबीर

नगर - पुण्यातील रूबी हॉल क्लिनिक येथे हृदयरोगावरील अत्याधुनिक व जागतिक दर्जाच्या उपचार सुविधा उपलब्ध आहेत. राज्यातील रूग्णांना या सुविधांचा लाभ होत असतो. याशिवाय रूग्णांना या सेवेचा लाभ मिळण्यासाठी १६ जुलै रोजी मोफत हृदयरोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. नगर शहरात तारकपूर येथील साई एशियन हॉस्पिटलमध्ये दुपारी २.३० ते ३.३० यावेळेत तपासणी शिबिर होईल. या शिबिरात ग्रँट मेडिकल फौंडेशन, रुबी हॉल क्लिनिक, पुणे येथील हृदयरोग तज्ज्ञ रूग्णांची तपासणी व मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती सिनियर मॅनेजर संतोष दसासे यांनी दिली. नगरमध्ये दर महिन्याला तिसऱ्या गुरूवारी कार्डियाक ओपीडी सेवा दिली जाते.

सध्याच्या काळात हृदयविकारावर अधिक परिणामकारक उपचार शक्य झाले असून याठिकाणी प्रसिध्द हृदयरोगतज्ज्ञ डॉक्टर रूग्ण तपासणी व उपचारांसाठी उपलब्ध असतात. छातीत दुखणे, दम लागणे, अस्वस्थ वाटणे अशी लक्षणे असलेल्या रूग्णांनी या शिबिरात तपासणी करून घ्यावी. नगरमधील शिबिरासाठी ०२४१-२३२५६४८ या क्रमांकावर नाव नोंदणी करावी असे आवाहन करण्यात आले आहे.

# अनुदान प्राप्त खाजगी प्राथमिक शिक्षक व सेवकांच्या सहकारी पतसंस्थेची १८ जुलै रोजी वार्षिक सभा

नगर - येथील अनुदानप्राप्त खाजगी प्राथमिक शिक्षक व सेवकांची सहकारी पतसंस्थेची ३५वी वार्षिक सर्वसाधारण सभा अध्यक्ष श्रीनिवास म. मुत्याल यांच्या अध्यक्षतेखाली १८ जुलै रोजी सायंकाळी ५ वाजता श्री समर्थ विद्या मंदिर (सांगळे गल्ली, नगर) येथे होत आहे. या सभेसाठी सभासदांनी उपस्थित रहावे, असे आवाहन मानद सचिव अ. श. महाजन यांनी केले आहे.

मागील वार्षिक सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे, गेल्या वर्षीचा अध्यक्षांचा अहवाल वाचून मंजूर करणे, वैधानिक लेखापरिक्षण अहवाल वाचून मंजूर करणे, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक वाचून मंजूर करणे, २०२५-२६ च्या नफा वाटणीस मंजुरी देणे, चालू सालाकरिता व्यवस्थापक समितीने तयार केलेले अंदाजपत्रक मंजूर करणे, चालू वर्षीसाठी हिशेब तपासणीसाची नेमणूक करणे, अंदाजपत्रकापेक्षा कमी-जास्त खर्चास मंजुरी देणे, दोष दुरूस्ती अहवाल वाचून मंजूर करणे, उपविधी दुरूस्त करणे आदि विषय या सभेमध्ये सभासदांच्या उपस्थितीत चर्चेसाठी घेण्यात येणार आहेत. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी आलेल्या विषयांचाही यामध्ये समावेश आहे.

संस्थेचा वार्षिक अहवाल आणि हिशेबासंबंधी स्पष्टीकरणासंदर्भात काही प्रश्न वा सूचना असल्यास लेखी स्वरूपात त्या मानद सचिव अ. श. महाजन अथवा लेखनिक सु. द. कुलकर्णी यांच्याकडे १५ जुलैपर्यंत द्याव्यात. यासंदर्भातील कागदपत्रे याच दिवशी सकाळी १०.३० ते ३ या वेळेत पहावयास मिळतील. गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास त्याच दिवशी ही सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने सुरू करण्यात येईल. यास गणसंख्येचे बंधन नसेल, असे कळविण्यात आले आहे.

सभेनंतर सेवानिवृत्त व आदर्श शिक्षक तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आयोजित करण्यात आला आहे. यासाठी गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांनी त्यांची मार्कशीटची सत्यप्रत कार्यालयात पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



सारडा महाविद्यालयाच्या ग्रंथालयास हिंद सेवा मंडळाचे सदस्य आणि उद्योजक सागर बक्षी यांनी विविध विषयांची उपयुक्त पुस्तके भेट दिली आहेत. याप्रसंगी हिंद सेवा मंडळाच्या संचालकांनी त्यांचा सत्कार केला.

# पेमराज सारडा महाविद्यालयाच्या ग्रंथालयाला पुस्तके भेट

नगर - सारडा महाविद्यालयाच्या ग्रंथालयास हिंद सेवा मंडळाचे सदस्य आणि उद्योजक सागर बक्षी यांनी विविध विषयांची उपयुक्त पुस्तके भेट दिली आहेत. त्यांनी या ग्रंथाचा संग्रह हिंद सेवा मंडळाचे सचिव संजय जोशी यांच्याकडे सुपूर्द केला. या प्रसंगी वरिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन सुमतीलाल कोठारी, कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन मधुसूदन सारडा, जेष्ठ मार्गदर्शक ब्रिजलाल सारडा व अजित बोरा, कार्यकारणी सदस्य विष्णु सारडा, डॉ.पारस कोठारी, अनंत देसाई, जगदीश झालानी, रणजीत श्रीगोड, प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित, उपप्राचार्य गिरीश पाखरे उपस्थित होते.

संजय जोशी यांनी आभार व्यक्त करताना सांगितले, सारडा महाविद्यालयाचे ग्रंथालय खूप मोठे आहे. विविध विषयांच्या ग्रंथाचा भांडार येथे आहे. या साहित्य खजिन्यात सागर बक्षी यांनी अधिक भर टाकली आहे.

सागर बक्षी यांनी सारडा महाविद्यालयाच्या ग्रंथालयास दिलेल्या पुस्तकांचा महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी, यांना निश्चितच उपयोग होणार आहे. सामाजिक जाणीवेतून केलेली मदत होईल अशी ग्वाही ब्रिजलाल सारडा यांनी दिली.

महाविलायाचे ग्रंथपाल प्रा.डॉ राजेंद्र मारवाडे यांनी आभार मानले.

# राज्यातील जादूटोणाविरोधी जनजागृती समितीसाठी ३१ जुलैपर्यंत अर्ज मागविले

नगर - शासनाच्या 'महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालणे व त्यांचे समूळ उच्चाटन करणे अधिनियम, २०१३' तसेच शासन निर्णयानुसार जिल्हास्तरावर जादूटोणाविरोधी कायदा जनजागृती, प्रचार व प्रसार कार्यक्रम अंमलबजावणी समिती गठित करण्यात येत असून, समितीवरील अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीसाठी इच्छुकांनी ३१ जुलैपर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन सहायक आयुक्त प्रवीण कोरगंटीवार यांनी केले आहे.

समितीवर ७ अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यात येणार असून, त्यामध्ये किमान दोन महिला सदस्यांचा समावेश अनिवार्य राहील. समाजसेवक, अंधश्रद्धा निर्मूलन क्षेत्रात कार्यरत स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी तसेच संबंधित क्षेत्रातील अनुभवी व्यक्तींनी अर्ज करावेत. विहित नमुन्यातील अर्जासोबत उमेदवाराचा स्वपरिचय, अलीकडील पासपोर्ट आकाराचे छायाचित्र, आधार कार्ड अथवा अन्य ओळखपत्राची प्रत तसेच संबंधित क्षेत्रातील सामाजिक कार्याचा संक्षिप्त अहवाल आणि आवश्यक असल्यास त्यासंबंधीचे पुरावे जोडणे आवश्यक आहे.

अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत ३१ जुलै असून, अर्ज सहायक आयुक्त, समाज कल्याण, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सावेडी नाका, नगर-मनमाड मार्ग, अहिल्यानगर - ४१४००३ या पत्त्यावर कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष किंवा टपालाद्वारे स्वीकारण्यात येतील. ३१ जुलै २०२६ नंतर प्राप्त होणाऱ्या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही.

अधिक माहितीसाठी spldswo.nagargmail.com या ई-मेल पत्त्यावर किंवा ०२४१-२३२९३७८ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असेही सहायक आयुक्त प्रवीण कोरगंटीवार यांनी कळविले आहे.




डॉन बॉस्को विद्यालयामध्ये गटध्वज प्रदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शालेय मंत्रिमंडळाचा शपथविधी या वेळेस आयोजित करण्यात आला होता.

# डॉन बॉस्को विद्यालयामध्ये शालेय मंत्री मंडळाचा शपथविधी

नगर - डॉन बॉस्को विद्यालयामध्ये गटध्वज प्रदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शालेय मंत्रिमंडळाचा शपथविधी या वेळेस आयोजित करण्यात आला होता. शाळेचे विद्यार्थी प्रतिनिधी आणि गटाचे प्रतिनिधी यांची निवड लोकशाही पद्धतीने करण्यात आली. शाळेतील विद्यार्थ्यांनी गुप्त मतदान पद्धतीने मतदान करून विद्यार्थी प्रतिनिधी आणि गटाचे प्रतिनिधी यांची निवड केली. याद्वारे विद्यार्थ्यांना लोकशाहीचे महत्त्व समजण्यास मदत झाली.

नवनियुक्त प्रतिनिधींच्या शपथविधी कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव रेक्टर फादर रिचर्ड डिसल्वा हे उपस्थित होते. या कार्यक्रमाची सुरुवात ईश्वस्तवनाने झाली.

शालेय मंत्रिमंडळामध्ये निवडून आलेल्या शाळेचे सर्व नवनियुक्त प्रतिनिधी व वर्ग प्रतिनिधींना प्राचार्य अजित मुनीस यांनी सेवा, कार्यातील तत्परता, एकनिष्ठता व प्रामाणिकपणे कार्य करण्यासाठी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी रेक्टर फादर रिचर्ड, विद्यालयाचे प्राचार्य फादर अजित मुनीस, डॉन बॉस्को प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका शिल्पा वैजापूरकर, इंग्रजी माध्यमाच्या सुपरवायझर शैला मिसाळ, सहशिक्षिका पुष्पा सगळगिळे यांनी शाळेच्या मंत्रिमंडळातील विद्यार्थी प्रतिनिधींना गटाचा ध्वज व बॅच देऊन सन्मानित केले.

अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांनी संतांसारखे जीवन जगावे व दिलेली काम प्रामाणिकपणे करावे असा संदेश रेक्टर फादर रिचर्ड यांनी विद्यार्थ्यांना दिला. नवनियुक्त विद्यार्थी प्रतिनिधी स्तवन भाकरे, विद्यार्थिनी प्रतिनिधी गायत्री चौधरी, निळा गट प्रतिनिधी संग्राम जगताप व तृप्ती लोखंडे, पिवळा गट प्रतिनिधी सोहम गांगर्डे व अन्विता शिंदे, लाल गट प्रतिनिधी प्रज्वल बोर्डे व रिया गव्हाळे, निळा गट प्रतिनिधी ओम गव्हाणे व वैष्णवी वनारसे, प्राथमिक विभाग विद्यार्थी प्रतिनिधी देवांश माळवे व विद्यार्थिनी प्रतिनिधी प्रांजल काटकर, हिरवा गट प्रतिनिधी मयंक साळवे व शिवन्या सोनवणे, पिवळा गट प्रतिनिधी श्रेयांशू बडेकर व प्रशंसा साठे, लाल गट प्रतिनिधी साद पठाण व एंजल भालेराव, निळा गट प्रतिनिधी सम्यक बनसोडे व श्रावणी इथापे यांना प्राचार्य फादर अजित मुनीस यांनी कर्तव्य दक्षतेची शपथ दिली.

या कार्यक्रमासाठी विद्यालयाचे समन्वयक फ्रान्सिस पाटोळे व डॉ. शितल कोतकर यांनी सहकार्य केले.

कार्यक्रम प्रमुख किशोर मकासरे, मनीषा शिंदे व फ्रान्सिस क्षीरसागर यांनी कार्यक्रमाचे उत्तम नियोजन करून कार्यक्रम यशस्वीपणे आयोजित केला. या कार्यक्रमासाठी पालकांची उपस्थिती उल्लेखनीय होती.

सूत्रसंचालन मनीषा शिंदे यांनी केले. आभार प्रदर्शन सुहासिनी देठे यांनी केले. या विद्यार्थ्यांचे डॉन बॉस्को शैक्षणिक संकुलातील व्यवस्थापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

## आनंदऋषीजी योगा सेंटर

### आनंदयोग मधील योग साधकांचे अभिप्राय

मी २१ जुलै २०१३ रोजी योगा क्लास सुरु केला. तो आजपर्यंत चालू आहे आणि चालू राहणार. मला व्हेरीकोज व्हेनचा त्रास आहे. ती जी व्हेन फुगलेली आहे ती व्यायामामुळे खूप कमी झालेली आहे. मला त्याचा काही त्रास होत नाही. मला त्यामुळे इतका आत्मविश्वास वाटतो की योगामुळे ती पूर्णपणे बरी होईन. मी प्रयत्न करीत राहीन.

योगाची इतकी सवय लागली आहे की, ज्या दिवशी सुट्टी होईल त्या दिवशी अस्वस्थ वाटते. फ्रेश वाटत नाही. इतका योगाचा लळा लागलेला आहे. दुसरे महत्वाचे असे की अनिल मेहेर सर आम्हा सर्वांना योगरुपी अमृत देत असतात. आपण आपल्या शरीराची काळजी घेणे गरजेचे आहे. हे योगरुपी अमृत ग्रहण केल्यानंतर आपण आपले स्वास्थ्य नक्कीच चांगले राहणार आहे. प्रयत्न करत राहू. आणि योगाचा आनंद दररोज घेत राहू.



- सौ. सुनिता परभाणे,
समता कॉलनी, विनायक नगर, अहिल्यानगर

